मंगळवार, १४ मार्च २०२३
◆ वर्ष १५ ◆ अंक २३४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग
धनगर समाजाला २५ हजार घरे देणार -उपमुख्यमंत्री/२
वसंत बहरला; विविधरंगी रानफुलांची होतेय उधळण/७
खो-खो स्पर्धेत रा. फ. नाईक शाळा अजिंक्य/८

## कांद्याला प्रति क्विंटल ३०० रुपये सानुग्रह अनुदान -मुख्यमंत्री



**मुंबई :** कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रति क्विंटल ३०० रुपये सानुग्रह अनुदान देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी (दि. १३) केली. या संदर्भात विधानसभेत निवेदन करताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, देशातील इतर राज्यातील कांद्याचे उत्पादन वाढल्याने पुरवठ्याच्या प्रमाणात मागणी कमी आहे. त्यामुळे कांद्याच्या दरामध्ये घसरण झाली आहे. उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने एक समिती नेमली होती. समितीने २०० आणि ३०० रुपये प्रतिक्विंटल शिफारस केली होती, परंतु हे सरकार कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणारे असून त्यांना दिलासा देण्यासाठी सानुग्रह अनुदान म्हणून प्रति क्विंटल ३०० रुपये देण्याचा निर्णय घेतल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिली.

# मुंबई-गोवा महामार्गावरील पनवेल ते इंदापूरचे काम युद्धपातळीवर करा -मंत्री रवींद्र चव्हाण



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणामील पनवेल ते कासू व कासू ते इंदापूर या ८४ किमीच्या रस्त्याच्या रखडलेल्या काँक्रिटीकरणाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी (दि.१३) दिले.

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे, हेच या सरकारचे उद्दिष्ट्य आहे. महामार्गाचे काम १० पॅकेजेसमध्ये सध्या सुरू आहे. त्यापैकी पाच पॅकेजेसचे काम पूर्ण झाले असून उर्वरित पॅकेजेसचे काम प्रगतीपथावर आहे, तसेच चौपदीकरणाचे काम जलदगतीने पूर्ण करण्यासाठी सर्व उपाययोजना करण्याचे निर्देशही मंत्री चव्हाण यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना या वेळी दिले.

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणासंदर्भात सोमवारी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात कोकणातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींची बैठक झाली. या बैठकीला शिक्षणमंत्री दीपक केसरकर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार जयंत पाटील, आमदार भरत गोगोवले, आमदार राजन साळवी, आमदार वैभव नाईक, आमदार शेखर निकम आदी आमदार उपस्थित होते. या वेळी राष्ट्रीय महामार्गाचे वरिष्ठ अधिकारी, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागचे सचिव व अन्य अधिकारी उपस्थित होते.

मुंबई- गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणांतर्गत रायगड जिल्ह्यातील कासू ते पनवेल या सुमारे ४२ किमीच्या महामार्गावरील एका लेनचे काम मे महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल, तसेच याच महामार्गावरील दुसऱ्या लेनच्या रस्त्यावरील खड्डे लवकरच भरण्यात येतील. या रस्त्याचे पॅचवर्क तसेच आवश्यक काँक्रिटीकरणाचे काम लवकर करण्याचे निर्देशही मंत्री चव्हाण यांनी दिले. चौपदरीकरणांतर्गत जी काही रखडलेली कामे शिल्लक आहेत. ते लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने युद्धपातळीवर काम करण्यात येतील.

नॅशनल हायवे अॅथोरिटी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय राखून कामे वेळेत व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. रखडलेल्या सर्व कामांची प्रगती पाहण्याच्या दृष्टीने या कामाचे शूटिंग ड्रोनच्या सहाय्याने करावे. ज्या ठिकाणी ब्लॅकस्पॉट्स आहेत. ते काम पावासाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात येईल, तसेच रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे शिल्लक काम हे नियमित कंत्राटदारांकडून करण्यात येईल. यामुळे पावसाळ्यात व गणेशोत्सवापूर्वी महामार्गाचे काम झाल्याने प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### परशुराम घाटाला पर्यायी मार्ग पावसाळ्यापूर्वी सज्ज

परशुराम घाटातील कामासाठी घाट किमान सात दिवस बंद ठेवावा लागेल. त्यामुळे या घाटातील वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग असलेला चेरणीचा पर्यायी मार्ग पावसाळ्यापूर्वी सुसज्ज करण्यात येईल, तसेच ज्या जिल्ह्यांमध्ये भूसंपादनाची प्रक्रिया प्रलंबित आहे, ती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

(अधिक छायाचित्रे पान ६ वर...)



# भावनिक न होता स्वतंत्र विद्यापीठाकडे वाटचाल करावी
## माजी कुलगुरू विजय खोले यांचे प्रतिपादन

**पनवेल : प्रतिनिधी**

सीकेटी महाविद्यालयाची स्वायत्त विद्यापीठाकडे वाटचाल होत असताना जग कोठे चालले आहे, याचा विचार करून भावनिक न होता स्वतंत्र विद्यापीठाकडे वाटचाल करावी लागेल, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू विजय खोले यांनी रविवारी (दि.१२) महाविद्यालयाच्या दोन दिवसीय रौप्य वर्ष महोत्सव समारंभाची सांगता करताना केले.

### 'सीकेटी'च्या रौप्य वर्ष महोत्सवाची सांगता

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाला २५ वर्षे झाल्याने दोन दिवसीय रौप्य वर्ष महोत्सव समारंभ संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता. त्याची सांगता मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू विजय खोले, 'रयत'चे चेअरमन अनिल पाटील, (पान २ वर..)

**सीकेटी महाविद्यालयाला २५ वर्षे झाली. आता पुढील कामकाज अजून जोमाने करायचे आहे, कारण ५० वर्षांनंतर त्याचे चांगले फळ लोकांना दिसले पाहिजे. तुमच्यासारख्या गुरूंमुळे आमची प्रगती झाली. तुमच्यामुळे हे यश मिळाले म्हणून तुमचा आज सत्कार केला. विद्यार्थ्यांच्या यशामुळे आमचे नाव झाले. आपले धोरण व दिशा एकच असल्याने आपण पुढे जात आहोत.**
**-लोकनेते रामशेठ ठाकूर,** माजी खासदार

**मला 'सीकेटी'चा हेवा वाटतो. रामशेठ यांचा प्रवास अण्णांसारखाच आहे. त्यांनी नोकरी केली, उद्योग केला, राजकारण आणि समाजकारण केले. रामशेठनी पण तसेच केले. अण्णांनी 'रयत'ची स्थापना केली. आज रयत ब्रँड आणि रामशेठ या दोघांवर आम्ही संस्था चालवतो. हा रामाचा स्पर्श आहे. परिसापेक्षा मोठा आहे. आता विद्यापीठ उभे रहावे ही इच्छा असून त्यासाठी मदत आम्ही करूच.**
**-अनिल पाटील,** चेअरमन, रयत शिक्षण संस्था

## निवडक

### उद्धव ठाकरेंना धक्का; सुभाष देसाईंचा मुलगा शिवसेनेत

**ठाणे :** ठाकरे कुटुंबीयांचे निकटवर्तीय समजले जाणारे नेते सुभाष देसाई यांचे पुत्र भूषण देसाई यांनी सोमवारी (दि. १३) शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत भूषण देसाई यांनी प्रवेश केला. भूषण देसाई यांनी म्हटले की, बाळासाहेब हेच माझे दैवत आहेत. महाराष्ट्राचा विकास आणि बाळासाहेबांचा विचार पुढे घेऊन जाण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे करीत आहेत.त्यामुळे त्यांच्यासोबत काम करण्याचा निर्णय घेतला आहे.

### मुंबईत गुंगीचे औषध देऊन अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**मुंबई :** १७ वर्षीय मुलीला पळवून नेऊन तिला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर बलात्कार केल्याप्रकरणी वांद्रे पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. आरोपींनी वांद्रे पश्चिम येथून पीडितेला जबरदस्तीने गाडीत बसवून एक गोळी दिली. मुलीला गुंगी येऊ लागल्यानंतर तिला पालघर येथील एका घरात नेऊन तिच्यावर बलात्कार केला. पीडितेने शुद्धीवर आल्यानंतर आरोपीला जाब विचारला असता, आरोपीने साथीदारासह पुन्हा तिच्यावर अत्याचार केले व त्याचे चित्रीकरण केले.

पेणच्या कोपर फाटा येथे राडा
## दोन गटांत हाणामारी; प्रवाशांनाही लुटले



**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील कोपर फाटा येथील हॉटेल मिलन पॅलेससमोर दोन गटात जोरदार हाणामारी झाल्याचे पहायला मिळाले. यामध्ये तीस ते पस्तीस जणांच्या जमावाने दोन व्यावसायिकांच्या वादातून लक्झरी बसवर दगडफेक करीत गोळीबारही केल्याची घटना सोमवारी (दि. १३) पहाटे तीन वाजण्याच्या दरम्यान घडली.

लक्झरी बसमधील प्रवाशांनाही मारहाण करण्यात आली. वृद्ध, महिलांनाही या जमावाने सोडले नाही. एका प्रवाशाला चार ते पाच जण मारहाण करीत होते. सोडवायला गेलेल्या इतर प्रवाशांचे दागिनेही लुटण्यात आले आहेत. लूटालूट झाल्याने लक्झरी बस आणि त्यातील प्रवासी तिथेच थांबले. हे प्रवासी दापोलीवरून बोरीवलीला जात होते. या वेळी तीन ते चार गाड्यांमधून आलेल्या ३०-३५ लोकांनी त्यांना मारहाण केली. गळ्यातील मंगळसूत्र, चेन, आदी वस्तू या लोकांनी हिसकावून नेल्या. याबाबत दादर सागरी तपास करीत आहेत.

# महाविकास आघाडीच्या मोर्चाचा बोजवारा
## नागरिकांनी फिरवली पाठ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल, उरण महाविकास आघाडीतर्फे मालमत्ता कराविरोधात सोमवारी (दि.१३) काढण्यात आलेल्या मोर्चाला शहरी भागासह ग्रामीण भागातील लोकांनी अक्षरशः पाठ फिरवल्याचे चित्र दिसून आले. माजी आमदार बाळाराम पाटील यांनी पाच हजारांपेक्षा जास्त नागरिक मोर्चाला उपस्थित राहतील, अशी वल्गना केली होती, मात्र पोलिसांच्या माहितीनुसार, प्रत्यक्षात केवळ ८०० ते हजार नागरिक उपस्थित होते. त्यामुळे हा मोर्चा खऱ्या अर्थाने सपशेल अपयशी ठरला आहे.

या मोर्चात महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने निवेदन देण्यासाठी आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेतली. या वेळी आयुक्तांनी शासनाची व महापालिकेची बाजू ठोसपणे मांडल्यामुळे शिष्टमंडळाची गोची झाली व यातूनच शासन आणि महापालिका नागरिकांना दिलासा देण्याबाबत किती सकारात्मक आहे, हे दिसून आले.

मोर्चाची सांगता करताना काही पुढाऱ्यांनीही आपल्या भाषणात या मुद्द्याचा उल्लेख करून महापालिकेची बाजू मांडली. तत्पूर्वी मालमत्ता कराबाबत भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी आयुक्त गणेश देशमुख यांची घेतलेली भेट कामी आली असून त्यामुळेच नागरिकांना दिलासा मिळणार आहे. (पान २ वर..)

### अस्वच्छता पसरविल्याने संताप

पनवेल महापालिकेने लाखो रुपये खर्च करून महात्मा गांधी उद्यानाचे सुशोभिकरण केले होते, मात्र महाविकास आघाडीने काढलेल्या मोर्चामुळे या उद्यानाला कचऱ्याचे स्वरूप आले होते. मोर्चेकऱ्यांनी ठिकठिकाणी अर्धवट खाल्लेले वडापाव, रिकाम्या पाण्याच्या बाटल्यांचा खच दिसून आल्याने पनवेलकर संतप्त झाले असून त्यांनी महाविकास आघाडीचा निषेध केला आहे. एकंदरीत पाहता हा मोर्चा पूर्णपणे फेल झाल्याचे चित्र दिसून आले.

## 'गड-किल्ल्यांवर मद्यपान केल्यास होणार कारवाई'

**मुंबई : प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील गड किल्ल्यांवर आता मद्यपान केल्यास तीन महिने तुरूंगाची वारी होऊ शकते कारण तसा प्रस्ताव राज्य सरकार मंजुरीसाठी पाठवणार असल्याची माहिती मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सोमवारी (दि. १३) सभागृहात दिली.

गड किल्ल्यांवर मद्यपान करणाऱ्यांना फक्त तीन महिन्यांचा तुरूंगवासच नाही, तर १० हजारांचा दंड ठोठावण्याचीही तयारी राज्य सरकारने केली आहे. त्याचसोबत, प्रत्येक गड-किल्ल्यावर हेरिटेज मार्शल नेमण्याचीही घोषणा मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास महाराष्ट्राच्या इतिहासाचा अमूल्य ठेवा असणाऱ्या आणि ज्यांच्या अंगाखांद्यांवर इतिहास घडला, त्या गड-किल्ल्यांवर मद्यपान करून त्याचे पावित्र्य घालवणाऱ्यांना चांगलाच चाप बसेल, अशी आशा निर्माण झाली आहे.

# प्रत्येक क्षेत्रात महिला पुढे -आमदार प्रशांत ठाकूर
## कामोठ्यात सुषमा स्वराज गौरव पुरस्कार प्रदान



(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशात कुठलेही क्षेत्र असे राहिलेले नाही की, ज्या क्षेत्रामध्ये आपल्या माता-भगिनी मागे आहेत, असे गौरवोद्गार भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामोठे येथे पुरस्कार प्रदान सोहळ्यावेळी केले.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून भाजप महिला मोर्चाच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात आले. महिला दिन आणि भारताच्या पहिल्या महिला परराष्ट्रमंत्री दि. सुषमा स्वराज यांच्या स्मृतीपित्यर्थ सुषमा स्वराज गौरव पुरस्कार प्रदान समारंभ रायगड जिल्हा भाजप महिला मोर्चाच्या वतीने हा समारंभ कामोठे येथील जीवनविद्या ज्ञानसाधना केंद्रात आयोजित करण्यात आला होता.

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील, उत्तर रायगड संयोजिका चारुशीला घरत, संध्या शारबिद्रे, भाजपनेते दीपक बेहेरे, भाजपचे कामोठे शहर अध्यक्षा वनीता पाटील, महिला मोर्चा पनवेल तालुका अध्यक्षा रत्नप्रभा घरत, कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, वर्षा प्रशांत ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, अॅड. वृषाली वाघमारे, कुसूम म्हात्रे, रुचिता लोंढे, प्रमिला पाटील, भटके विमुक्त आघाडीच्या जिल्हाध्यक्षा विद्या तामखेडे, प्रतिभा भोईर, शिल्पा म्हात्रे, योगिता भगत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. (पान २ वर..)



**पनवेल :** राज्यातील बांधकाम प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या मच्छीमार बांधवांना राज्य शासनाने नुकसानभरपाई देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे गव्हाण येथील सर्वोदय मच्छीमार कॉ. ऑप. सोसायटीच्या सदस्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेत या निर्णयाचे स्वागत केले. या वेळी चेअरमन चंद्रकांत कोळी, प्रमोद कोळी, किशोर कोळी, राजकिरण कोळी, सुनील कोळी, महादेव कोळी, सुनील पडकर, अनिल कोळी, काशिनाथ कोळी यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते.

# संपावर जाण्याचा निर्णय मागे घ्यावा!

## कर्मचारी संपाबाबत तोडगा काढण्यासाठी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी घेतली बैठक

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याच्या मागणीबाबत अभ्यास करण्यासाठी राज्य शासन प्रशासकीय अधिकाऱ्यांची समिती गठीत करणार आहे. विहित कालावधीत ही समिती अहवाल देईल. निवृत्तीनंतर अधिकारी-कर्मचाऱ्यांना सुरक्षित व सन्मानपूर्वक आयुष्य जगता यावं हे तत्व म्हणून मान्य करण्यात आल्याचे सांगतानाच संपावर जाण्याचा निर्णय मागे घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.

विधीमंडळातील मुख्यमंत्री समिती कक्षात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कर्मचारी संघटनांची बैठक घेण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस, विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, अखिल भारतीय राज्य सरकारी महासंघाचे उपाध्यक्ष विश्वास काटकर यांच्यासह चतुर्थश्रेणी कर्मचारी महासंघ, शिक्षक भारती, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ, जिल्हा परिषद युनियन, विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचारी संघटना, माध्यमिक विद्यालय शिक्षकेतर कर्मचारी संघटना, जुनी पेन्शन संघटना, महाविद्यालयीन प्राध्यापक संघटना, प्राथमिक शिक्षक संघटना यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



### संघटनांनी सहकार्य करावे

ज्या राज्यांनी ही जुनी निवृत्ती योजना लागू केली आहे, त्याबाबत त्यांचा रोडमॅप अद्यापही तयार नाही. या योजनेबाबत राज्य शासन जे धोरण स्विकारेल त्यात याआधी निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे नुकसान होवू देणार नाही. कर्मचारी संघटनांनी चर्चेत मार्ग काढण्यासाठी सहकार्य देण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले. यावेळी श्री.काटकर यांनी संपाबाबत आणि जुन्या निवृत्ती योजनेबाबत मुद्दे मांडले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले, राज्याच्या विकासात कर्मचाऱ्यांचा सहभाग महत्वाचा आहे. लोकप्रतिनीधी आणि प्रशासन ही रथाची दोन चाके आहेत. त्यामुळे जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करावी या मागणीच्या मागे जे तत्व आहे त्या विरोधात सरकार नाही. यातून मार्ग काढण्याची मानसिकता सरकारची आहे. अधिकारी-कर्मचारी निवृत्त झाल्यावर त्यांची सामाजिक सुरक्षा जोपासण्यासाठी चर्चेतून मार्ग काढला जाईल. यासंदर्भात प्रशासकीय अधिकारी, सेवानिवृत्त कर्मचारी यांची समिती नेमली जाईल. ही समिती कालबद्धरित्या अहवाल सादर करेल, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

# धनगर समाजाला २५ हजार घरे देणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा




**मुंबई : प्रतिनिधी**

आपण वेगवेगळ्या घरांच्या योजना तयार करतो, मात्र त्याचा धनगर समाजाला पाहिजे तसा फायदा मिळत नाही. त्यामुळे हे स्पष्टपणे ठरवले की, यातील २५ हजार घरे धनगर समाजाला मिळाली पाहिजेत. ही संख्या किमान आहे, कमाल नाही. त्यामुळे यापेक्षा अधिक घरेही मिळाली तर अधिक चांगले आहे, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

धनगर समाजासाठी राज्य अर्थसंकल्पात भरघोस तरतूद केल्याबद्दल धनगर समाजाच्या विविध संघटनांतर्फे फडणवीस यांचा भाजप प्रदेश कार्यालयात सोमवारी (दि. १३) सत्कार करण्यात आला. धनगर समजासह राज्यातील सर्व उपेक्षित, वंचित समाजाच्या कल्याणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकार वचनबद्ध आहे. भाजपच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारच्या वेगवेगळ्या योजना उपेक्षित, वंचित वर्गापर्यंत पोहचवून दीनदयाळ उपाध्याय यांचा अंत्योदयाचा विचार प्रत्यक्षात आणू, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ग्राम विकास व पंचायत राज मंत्री गिरीश महाजन, आमदार गोपीचंद पडळकर, माजी आमदार रामराव वडकुते, माजी मंत्री कृपाशंकर सिंग आदी या वेळी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले की, धनगर समाजासाठी राज्याच्या अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आलेल्या सर्व योजना अभ्यास करूनच तयार करण्यात आल्या आहेत. मेंढपाळांना बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्यासाठीच शेळी व मेंढी विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या सर्व योजनांसाठी जाहीर केलेला निधी उपलब्ध होणार आहे. पंतप्रधान आवास योजनेतून किमान २५ हजार घरे धनगर समाजातील लोकांसाठी बांधली जातील. आदिवासी पाडे, धनगर वस्त्या, बंजारा तांडे यांच्यासाठी रस्ते बांधण्याची योजना सरकारने आखली आहे.

भाजप संघटनेच्या माध्यमातून धनगर समाजासाठीच्या योजना गरजू वर्गापर्यंत पोहचविल्या जातील. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे हे पक्षाच्या प्रसारासाठी अखंड मेहनत घेत आहेत. बावनकुळे यांनी राज्य सरकारच्या मागे पक्षाची ताकद उभी केली आहे. या माध्यमातून वंचितांसाठीच्या योजना गरजूंपर्यंत पोहचविल्या जातील, असा विश्वासही फडणवीस यांनी व्यक्त केला. या वेळी धनगर समाजाच्या परंपरेप्रमाणे उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा घोंगडी, फेटा आणि कुऱ्हाड देऊन सत्कार करण्यात आला.

# दफन भूमीच्या जागेसाठी तहसिल कार्यालयावर मोर्चा




**चौक : प्रतिनिधी**

परंपरागत वहीवाटीच्या जागेत मृतांना दफन करण्यासाठी कायम स्वरुपी जागा मिळावी यासाठी आदिवासीं बांधव यांनी खालापूर तहसिल कार्यालयावर मोर्चा काढून निवेदन सादर केले.

खालापूर तालुक्यातील मुळगाव ठाकूरवाडी येथील आदिवासीं बांधव तेथील स.नं.२४७२ येथे मयताचे दफन करत आहेत. गेली अनेक वर्षे हे ग्रामस्थ येथे राहत आहेत. ही जागा एका खाजगी मालकीची आहे असे समजते, त्यांनी ती जागा सुनील गुप्ता यांना कायमस्वरुपी विकली आहे. मात्र १० गुंठे जागेला कुंपण घालून दफन करण्यासाठी मोकळी सोडली आहे. नुकतेच एक आदिवासी वाडीत मयत झाल्यावर सुनील गुप्ता यांनी तेथे दफन करून देण्यास मज्जाव केल्याने वाद निर्माण झाला होता.

खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी व पोलिस प्रशासनाने समजूत काढून तो अंत्यविधी पार पडला. परंतु हे नेहमी होणे शक्य नसल्याने कुंपण घालून ठेवलेली १० गुंठे जागा ही दफनभूमी म्हणून राखीव ठेऊन आदिवासी बांधवांचे ताब्यात देण्यासाठी आदिवासी ठाकूर उन्नती सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य नोंदणीकृत या संस्थेने तहसिल कार्यालयावर धडक देऊन निवेदन सादर केले व या जागेची मागणी केली आहे.

यावेळी जिल्हा अध्यक्ष मालू निरगुडे, तालुका अध्यक्ष नारायण निरगुडे, शोषित जनआंदोलनचे दिलिप डाके, पांडुरंग पारधी, राम शिंगवा, राजू सुतक, राजु हमने यांच्यासह मुळगाव ठाकूरवाडी येथील आदिवासीं बांधव व महिला उपस्थित होत्या.

# कोंढाणे धरणाच्या जमिनीबाबत आदिवासींचे हक्क अबाधित

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील कोंढाणे धरण प्रकल्पासाठी मौजे कोंढाणे व चोची येथील खासगी जमीन थेट खरेदीबाबतचा प्रस्ताव सिडकोकडून जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला आहे. या परिसरातील आदिवासींच्या जमिनी खरेदी करण्यासंदर्भात तक्रारी असून जिल्हाधिकारीस्तरावर याबाबत एका महिन्यात सविस्तर चौकशी करण्यात येऊन जो दोषी आढळेल त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधान परिषदेत सांगितले.

> महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आश्वासन

मंत्री विखे पाटील म्हणाले, येथील आदिवासींच्या जमिनी खरेदी करण्यासंबंधीच्या तक्रारींसंदर्भात तहसीलदार स्तरावर सुनावण्या सुरू आहेत. अद्याप जमीन हस्तांतरणाची कार्यवाही झालेली नाही. तथापि, या सुनावण्या तहसीलदार दर्जाच्या अधिकाऱ्यांनी घेणे योग्य आहे किंवा कसे, याबाबतही चौकशी केली जाईल. आदिवासींचे हक्क अबाधित राखले जातील. त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यास शासन बांधिल असून कोणालाही बेदखल करणार नाही. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पारदर्शकपणे चौकशी केली जाईल, तसेच यात कुणालाही पाठिशी घातले जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ जमीन मालक **श्री. संतोष उंदीर तांबोळी** यांच्या मालकी हक्क, ताबे कब्जा व वहीवाटीतील **मौजे सालवड, ता. कर्जत, जि. रायगड** येथील **सर्व्हे नं./हिस्सा नं. ५२/१ ब चे एकूण क्षेत्र हे ० आर. ४६ प्रति ७०** ही जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील साठेकरार / खरेदीखत हे आमचे अशिल आणि मुळ जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर आमचे अशिल हे वर उल्लेखित जमिन मालकांसमवेत सदर मिळकतीसंदर्भातील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे.

**सही/-**
**धनंदा प्रदिप मोकल-ठाकूर**
**( वकील उच्च न्यायालय)**
पत्ता : शॉप नं. १४, शिव चेंबर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर- ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे


# कामगार नेते सुरेश पाटील यांचा बी.एम.एस. याच्याकडून सत्कार




**पुणे : प्रतिनिधी**

भारतीय मजदूर संघाच्या (बी.एम.एस.) महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीची बैठक शनिवार रविवार या दोन दिवस भारतीय मजूर संघाचे कार्यालय पुणे येथे झाली. या बैठकीमध्ये आगामी येणारे कार्यक्रम, जिल्ह्यातील संघटनात्मक कार्य, एल-२ च्या कार्यक्रमावर आगामी काळात लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे.

याबाबत या बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. विशेष म्हणजे देशातील पारादवीप ओरिसा, जेएनपीटी महाराष्ट्र, न्यू मंगलोर कर्नाटका या तीन बंदरांमध्ये भारतीय मजदूर संघाला विजय प्राप्त झाल्याबद्दल भारतीय मजदूर महासंघाचे महासचिव सुरेश पाटील यांचा महाराष्ट्र प्रदेश बी. एम. एस. यांच्यावतीने महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अनिल डुमणे, महासचिव मोहन येणुरे, क्षेत्रीय संघटन मंत्री पी. व्ही. राजेश, संघटक श्रीपाद कुटारकर यांच्यावतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

या बैठकीला १७ जिल्ह्याचे व २१ महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते या सभेत केंद्रीय पदाधिकाऱ्यांना आण्णा धुमाळ, नीलिमा चिमूरे मॅडम उपस्थित होते.

# महानिर्मिती मुख्यालयातर्फे महिला दिनानिमित्त कार्यक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीतर्फे प्रकाशगड मुख्यालय येथे पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे व पद्मश्री डॉ. स्मिता कोल्हे यांनी एका विशेष कार्यक्रमामध्ये उपस्थितांसोबत संवाद साधला. महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन यांच्या संकल्पनेतून जागतिक महिला दिनानिमित्त या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक (वित्त) श्री. बाळासाहेब थिटे व संचालक (संचलन) संजय मारुडकर यांचे हस्ते महानिर्मितीतर्फे या दाम्पत्याचा विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक (वित्त) बाळासाहेब थिटे यांनी पणती या कवितेच्या माध्यमातून स्त्री शक्तीचे महत्व विषद केले तर संचालक (संचलन) संजय मारुडकर यांनी महानिर्मितीमधील महिला कर्मचारी यांचे विशेष योगदान सांगताना प्रकल्प राष्ट्रार्पण सोहळयावेळी ६६० मेगावॅट औष्णिक प्रकल्प संपूर्ण महिला कर्मचारी यांनी नियंत्रित केल्याचा आवर्जून उल्लेख केला.

सूत्रसंचालन मानसी सोनटक्के यांनी केले तर प्रास्ताविक मुख्य महाव्यस्थापक (मानव संसाधन) आनंद कोंत यांनी केले. प्रमुख अतिथींचे स्वागत सोनाली चुंगडे यांनी तर आभार स्वप्निता राठोड यांनी मानले.





## MAHATRANSCO — SRM E-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification:

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender-13/ 2023-24 Dtd. 14.03.2023 **RFx No. 7000026431** | **Sub:** Invitation of SRM E-Tender for the work of providing various Consumable materials at various substations under EHV (O&M) Division, Mahad for FY 2023-24. | Up to Rs. 3,75,890/- (Including GST) |

**EMD** will be 1% of the **Estimated Cost** or Rs. 5,000/- whichever is the higher
**Tender Fee** will be the 500/- plus GST + 1% Labour Cess.
**Bid Submission is From:** 14.03.2023 @ 00:00 Hrs to 20.03.2023 @ 23:59 Hrs for above tender. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**


## पान १ वरून

### भावनिक न होता स्वतंत्र विद्यापीठाकडे वाटचाल करावी

महाराष्ट्राचे उच्च शिक्षण विभागाचे माजी संचालक एस. एन. पठाण, माजी प्र. कुलगुरू नरेशचंद्रा, रुसाचे माजी वरिष्ठ सल्लागार विजय जोशी, विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. अजय भामरे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संस्थेचे सदस्य अनिल भगत, हरिश्चंद्र पाटील, जे. जी. जाधव, डॉ. प्रदीप कामतेकर, जयंत आपटे, पराग आजगावकर, प्राचार्य गणेश ठाकूर, प्राचार्य पी. पी. पवार, प्राचार्य अशोक वाघ, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आदींसह प्राध्यापक, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी माजी कुलगुरू विजय खोले यांनी बोलताना, मुंबई विद्यापीठाकडून नावाजलेले सीकेटी महाविद्यालय आज स्वायत्त झाले आहे. आता त्याचे स्वतंत्र विद्यापीठात रूपांतर करायचे आहे. ते होईल यात शंका नाही, पण त्यासाठी आर्थिक तरतुदीबरोबरच नवीन पिढीसाठी नवीन अभ्यासक्रम सुरू करावे लागतील. विद्यापीठाला आपले वेगळेपण सिद्ध करावे लागेल. येथील प्राध्यापकांना आपली शिक्षकवण्याची पद्धत बदलावी लागेल. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे लागेल. आंतरराष्ट्रीय दर्जाचा अभ्यासक्रम तयार करावा लागेल, जग कोठे चालले आहे याचा विचार करूनच भावनिक न होता स्वतंत्र विद्यापीठाकडे वाटचाल करावी लागेल, असे त्यांनी सांगितले.

तुकडोजी महाराज विद्यापीठाचे कुलगुरू एस. एन. पठाण यांनी, आजचा सोहळा हा कृतज्ञता सोहळा असल्याचे सांगून शिक्षक महाविद्यालय घडवतात. आपण रामशेठ ठाकूर यांच्याकडून प्रेरणा घेतल्याचा आवर्जून उल्लेख करून माणसामुळे माणूस घडतो, पैशाने नाही, आज अशी घडवायची आहेत. ती जबाबदारी प्राध्यापकांची असल्याचे त्यांनी सांगितले. माजी प्रकुलगुरू विजय जोशी यांनी, रामशेठ स्वप्न पाहतात आणि ती प्रत्यक्षात उतरवतात, असे सांगून पुढच्या २५ वर्षाच्या योजना करण्याचा आजचा दिवस असल्याचे सांगितले. नरेश चांदरा यांनी हे महाविद्यालय प्रगती पथावर रहाणार आहे. जे चांगले ते सीकेटीमध्ये आले पाहिजे यासाठी संस्थेचा प्रयत्न असतो, याचे आपण साक्षीदार असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी महाविद्यालयातील विद्यापीठात गुणवत्ता प्राप्त व खेळात प्रावीण्य मिळविणारे विद्यार्थी, यशस्वी माजी विद्यार्थी त्यांचा सत्कार हस्ते करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

### महाविकास आघाडीच्या मोर्चाचा बोजवारा

दरम्यान वक्त्यांनी नेहमीचेच बिनबुडाचे आरोप केल्याने उपस्थित नागरिकांनी वडापाव खाण्यात आणि पाणी पिण्यातच धन्यता मानली, तर अनेकांनी सेल्फी काढून सोशल मीडियावर आपली उपस्थिती दाखवत मोर्चातून काढता पाय घेतला. प्रशांत पाटील यांच्या नेहमीच्या रटाळ भाषणामुळे व्यासपीठावरील महाविकास आघाडीच्या पुढाऱ्यांनीही व्यासपीठावरून पळ काढला. मोर्चाच्या पार्श्वभूमिवर पोलिसांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता, मात्र नागरिकांपेक्षा पोलिसांचीच उपस्थिती अधिक दिसून आली. भाषणांवेळी पुढाऱ्यांनी मालमत्ता कराविषयी मुद्दे मांडण्याऐवजी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यावरच भर दिला.

### प्रत्येक क्षेत्रात महिला पुढे -आमदार प्रशांत ठाकूर

या वेळी पनवेल शहरातील अनिता कोलते, सुनीता लाहोट, सरोज टाक, पुष्पलता ठाकूर, डॉ. शुभदा नील, डॉ. सोनिया शितोले, सुषमा नाईक, अनिता भोर, सीमा तुपे, सुनिता जोशी, सारिका बिरारी, डॉ. स्वाती बिरमुळे, जिग्नीशा यादव, इंदुमती ठक्कर, अरुणा मुंढे, जयश्री शेलार, डॉ. सुषमा देवडीकर, हेमलता मोरे, मनिषा गावडे, डॉ. संगिता दळवी, मृदुला घडणीस, प्रगती कांबळे, ढमाताई पवार, सुचिता जोगळेकर, सुजाता ठाकूर, मनिषा घरत, सुषमा भागित, डॉ. स्मिता म्हात्रे, ॲड. दिपाली बांद्रे, स्मिता स्वामी, डॉ. पूर्वा पंडित, तृप्ती शर्मा, लक्ष्मी सोरटे, राजश्री जोशी, अश्विनी राऊत, भावना गुप्ता, आशा देशमुख, भक्ती साठेकर, उषा केळबाईकर, शुभलक्ष्मी पाटणकर, कांचन जाधव, स्मिता ठाकूर, सायली पवार, शितल शिंदे, पुजा लभाते, डॉ. मनिषा माने, शितल दिनकर, मानसी पोल, रोहिनी भिस्से, चंद्रकला भिमराव, अमिता पाटील, दिपीका जाधव, सारिका पाटील, तारा चौगुले, सुषमा तारे या महिलांचा सन्मान या सोहळ्यात करण्यात आला.


## MAHATRANSCO — EXTENSION TO E-TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026390** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-04/2023-2024. Extension to RFx E-Tender for Hiring of Vehicle at 220kV Tambati Substation for Period 01.04.2023 to 31.03.2024 under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 14.03.2023, 17:00 Hrs to 20.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 20.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 21.03.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

# विमानतळ प्रकल्पबाधित गावांची ओळख कायम ठेवण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील जी गावे विमानतळ प्रकल्पासाठी बाधित झाली आहेत. त्यांना सिडकोने भूखंड देऊन त्यांचे विस्थापन केले. त्या भूखंडाना सिडकोने वडघर पुष्पक नोड, पुष्पक नगर, आर १, आर २, आर ३, आर ४, आर ५ अशा प्रकारची नावे दिली. त्यामुळे गावांची ओळख पुसली गेली. ती ओळख सिडकोने गावांची जुनी नावे आहेत तीच नावे देऊन कायम ठेवावी, अशी मागणी भाजपचे वडघर पंचायत समिती विभागीय अध्यक्ष समीर केणी यांनी केली आहे.

सिडकोने पनवेल परिसरात होणाऱ्या विमानतळाच्या बांधणीसाठी चिंचपाडा, कोल्ही कोपर, पारगाव, ओवळे, कोंबडभुजे, उलवे सारख्या भागातील जमिनी संपादित केल्या. जमिनी संपादित करताना त्यांना मोबदला म्हणून २२.५ टक्केप्रमाणे भूखंड देण्यात आले. नवी मुंबई विमानतळ उभारताना जी गावे विस्थापित झाली आहेत त्यांना सिडकोने भूखंड देऊन तेथे इमारती उभ्या राहिल्या.



**...अन्यथा आंदोलन**

**सिडकोने याविषयी योग्य ते सहकार्य केले नाही तर आमदार महेश बालदी आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यास भाग पाडेल, असा इशारा भाजपचे समीर केणी यांनी सिडकोला दिला आहे.**

गावाचे गावपण जाते की काय असा प्रश्न तेव्हा अनेकांना पडू लागला. भूखंडवर इमारती उभ्या राहिल्या. भूखंड सिडकोचे असल्याने त्यांना नावेही सिडकोने दिली. काही ठिकाणी चिंचपाडा वासीय ग्रामस्थ एका ठिकाणी, काही ठिकाणी कोल्ही कोपर येथील तर काही ठिकाणी वरचे ओवळे ग्रामस्थ एका भागात वसले. त्यांना सिडकोने आर २, आर ३, वडघर पुष्पक नोड अशी नावे दिली, पण त्यामुळे या गावांची जुनी ओळख पुसली गेली.

चिंचपाडा हे गावदेखील त्यापैकी एक आहे. या गावालादेखील वसाहतीमध्ये समाविष्ट व्हावे लागले. ग्रामस्थांनी आपल्या रेशन कार्ड, आधार कार्ड, बँकेचे पासबुक यावरील पत्ता हा जुन्या गावातीलच आहे. कोणी पत्ता विचारला तर तो पत्तादेखील ग्रामस्थांना आता नीट सांगता येत नाही. त्यासाठी शासन दरबारी या नव्याने वसलेल्या वसाहतींनादेखील जुन्या गावांचीनावे लावण्यात यावीत, अशी मागणी नागरिक करीत होत.

याबाबत समीर केणी यांनी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्याकडे चर्चा केली असता बालदी यांनी सिडकोकडे पाठपुरावा सुरू केला आहे. २०१७ सालापासून समीर केणी हे याबाबत सिडको अधिकाऱ्यांना विचारणा करत आहे, पण सिडकोचे अधिकारी प्रतिसाद देत नसल्याचा आरोप केणी यांनी केला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पांतर्गत येणाऱ्या विविध समस्याबाबत निवेदन देण्यात आले असून या निवेदनांबाबत सहव्यवस्थापकीय संचालक यांच्या अहवालानुसार बैठक घेण्यात आली होती.

या निवेदनामध्ये त्यांनी आर १, आर २, आर ३, आर ४, आर ५ क्षेत्रासाठी चिंचपाडा गावाचे ग्रामस्थांच्या मागणीनुसार गावासंबधीत दस्तऐवज अथवा कागदपत्रावर नामांकरण व फलक उभारून देणेबाबत विनंती केलेली आहे. वरीष्ठ नियोजनकार व मुख्य अभियंता नवी मुंबई यांना आर १, आर २, आर ३, आर ४, आर ५ क्षेत्रासाठी चिंचपाडा गावाचे कागदपत्रावर नामांकरण व फलक उभारून देणेबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. आपल्या विभागामार्फत करून त्याबाबतचा अहवाल या विभागास सादर करावा, अशी मागणीदेखील करण्यात आली आहे.

# पनवेल स्टेशनवर भिकाऱ्यांकडून प्रवाश्यांची होतेय अडवणूक



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल रेल्वे स्टेशनवर भिकाऱ्यांकडून प्रवाश्यांची अडवणूक केली जात आहे. त्यांना हाकलणाऱ्या रेल्वे सुरक्षा जवानांचा व्हिडिओ काढून अत्याचार करीत असल्याचे मेसेज सोशल मिडियावर टाकणाऱ्यांमुळे रेल्वे सुरक्षा बलाचे जवान हतबल झालेत. त्यामुळे प्रवाशांना मात्र आता कोणाकडे दाद मागायची, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

मुंबईचे प्रवेशद्वार समजले जाणाऱ्या पनवेल स्टेशनवरून कोकण, गोवा, कर्नाटक, गुजरात, दिल्ली आणि नागपूरकडे जाणाऱ्या गाड्या ये-जा करीत असतात. या गाड्यांनी मोठ्या प्रमाणात प्रवाशी पनवेलला येतात. या प्रवाश्यांना भिकारी कुटुंबे अडवून भीक दिल्याशिवाय सोडत नसल्याने प्रवाशी हैराण झाले आहेत. दोन दिवसांपूर्वी एका महिलेला उतरताना अडवून ठेवली तर लिफ्ट जवळ ही प्रवाश्यांना अडवण्याचे प्रकार घडत आहेत. त्यांना एखाद्या प्रवाश्याने मारल्यास पोलिसांत तक्रार करण्याची ही ते धमकी देत असल्याचे काही प्रवाश्यांनी सांगितले.

रेल्वेचे वाणीज्य व्यवस्थापक सुधीर कुमार यांनी सांगितले की, याबाबत प्रवाश्यांच्या तक्रारी आल्यावर मी रेल्वे सुरक्षा बलाच्या अधिकार्यांना पत्र दिले. आमच्या मिटिंगमध्ये ही या विषयावर चर्चा होते. रेल्वे सुरक्षा बलाचे जवान त्यांच्यावर कारवाई करतात व त्यांना फलाटावर येताना दिसल्यास हाकलतात, पण स्टेशनच्या चारही बाजूंना प्रवेश करण्यासाठी जागा असल्याने ते पळून जातात आणि दुसऱ्या बाजूने आत येतात. स्टेशन बाहेर तयार झालेल्या झोपडपट्टीतील गर्दुले, महिला व लहान मुलांचा यामध्ये समावेश आहे. त्यांना मारल्यास रेल्वे सुरक्षा जवानांचा व्हिडिओ काढून अत्याचार करीत असल्याचे मेसेज सोशल मिडियावर टाकला जातो.

**आम्ही सुरतहून पनवेलला आलो. पनवेल स्टेशन उतरत असताना अचानक दरवाजात भिकाऱ्यांच्या ग्रुपने आम्हाला घेरले पैसे द्या, नाहीतर उतरून देणार नाही असे म्हणत अडवून ठेवले. जवळपास पोलीस नसल्याने आम्ही पैसे देऊन सुटका करून घेतली.**

**-हेतल मेथा, बेलापूर**



**पनवेल : कोपर येथील भाजप ज्येष्ठ नेते वसंतशेठ पाटील यांच्या निवासस्थानी वास्तूशांती पूजा आयोजित करण्यात आली होती. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख यांनी पूजेचे दर्शन घेतले. त्यांचे पाटील कुटुंबीयांकडून स्वागत करण्यात आले. या वेळी प्रितम नाईक, श्याम ठाकूर, वसंतशेठ पाटील आदी उपस्थित होते.**

# विक्रांत पाटील यांच्यातर्फे महिलांना 'सन्मान मातृशक्तीचा'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनाचे औचित्यसाधून बाळासाहेब पाटील लोकसेवा प्रतिष्ठान आणि भाजपचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांच्या माध्यमातून 'सन्मान मातृशक्तीचा' हा पुरस्कार वितरण सोहळा रविवारी (दि. १२) आयोजित करण्यात आला होता. पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात हा सोहळा झाला.

या सोहळ्याचा मुख्या आकर्षण हा स्वराज्य रक्षक संभाजी महाराज मालिकेच्या



(छाया : अक्षय शादुल)

प्राजक्ता गायकवाड हे होत्या तसेच या कार्यक्रमाला भाजपच्या प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक आणि स्त्रीरोगतज्ञ डॉ. निशीथ ओझा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी या' वेळी महिलांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती आणि महिला आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. तसेच या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अनेक महिलांचा 'सन्मान मातृशक्तीचा' हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या वेळी मराठवाडा विभागीय संघटन मंत्री संजय कौडगे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, कल्पना दासताने, आदर्श शैक्षणिक समूहाचे संचालक धनराज विसपुते, सुहासिनी केकाणे यांच्यासह पदाधिकारी आणि परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पनवेलमध्ये 'खेळ रंगला पैठणीचा'



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील फडके नाट्यगृहात खेळ रंगला पैठणीचा या कार्यक्रमाचे आयोजन जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि. १०) करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रिया इव्हेंट्स आणि बीबी बांठिया प्रस्तुत प्रमुख पाहुण्या म्हणून महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम प्रसिद्ध अभिनेत्री रसिका वेंगुर्लेकर उपस्थित होत्या.

या वेळी वर्षा प्रशांत ठाकूर, ममता म्हात्रे, टुरिझम ग्लोब क्वीन हर्षला तांबोळी, तू चाल पुढं या झी मराठीवरील मालिकेतील अभिनेत्री प्रतिभा गोरेगावकर, माजी नगरसेवक राजू सोनी, शिवसेना महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, बीबी बांठिया ज्वेलर्सचे मॅनेजिंग पार्टनर गौरव बांठिया, रितू राजेश डोंगरे, स्पर्श हॉस्पिटलचे प्रतिनिधी स्वप्निल म्हात्रे, द्वारकाधीश साडी सेंटरचे मालक वीरेंद्र जगे, 'पुण्यनगरी'चे संपादक राजेश खेडेकर, रेड विंगस हॉटेलचे मॅनेजिंग डायरेक्टर प्रतिभा सूर्यवंशी, चितळे एक्सप्रेसच्या वतीने भक्ती कर्वे, राजश्री सोनी, नाट्यनिर्माते मंदार काणे, माधुरी गोसावी, रमेश आंग्रे, प्रदीप आंग्रे, मधुसूदन साखरे आदी मान्यवरांसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

निवेदक हरीश मोकल यांनी निवेदन केले. पैठणीच्या या खेळामध्ये तब्बल ३०० पेक्षा जास्त महिलांनी सहभाग घेतला. ज्यामध्ये अंतिम फेरीमध्ये आठ महिलांनी प्रवेश केला होता. सुरशीच्या या खेळामधील शेवटच्या या आठ पैकी अंतिम तीन जणींना अनुक्रमे मीनाक्षी पाटील (पहिली), सुनिता कुडवे (दुसरी) आणि कांचन गडकरी (तिसरी) अशा मानाच्या पैठण्या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आल्या.

या वेळी नाट्यगृहात उपस्थित महिलांसाठी लकी ड्रॉ ठेवण्यात आला होता. या लकी ड्रॉमध्ये विजेत्या ठरलेल्या पाच महिलांनादेखील पारितोषिकांच्या रुपात पाच पैठण्या प्रदान करण्यात आल्या. याशिवाय प्रेक्षक महिलांनासुद्धा उखाण्यांसाठी विशेष भेटवस्तू देण्यात आल्या. एकूणच कार्यक्रमाचे आयोजक प्रिया इव्हेंट्सचे सर्वेसर्वा रसिक आंग्रे यांच्या माध्यमातून कार्यक्रम सुंदररित्या झाला.

# जागृत फाऊंडेशनतर्फे हास्य कविसंमेलन

**नवी मुंबई : बातमीदार**

जागृत फाऊंडेशन, नवी मुंबई संस्थेच्या वतीने शनिवारी (दि. ११) होळी सणानिमित्त हास्य कविसंमेलन आणि होळी मिलन कार्यक्रमाचे आयोजन खारघर येथे करण्यात आले होते. श्री रामकृष्ण आरोग्य संस्थानचे अध्यक्ष स्वामी श्री कंठानंदजी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वामीजींचे आशीर्वचन संबोधन झाले व त्यानंतर अरविंद राही, मनोज दुबे, शेखर अस्तित्व, राज बुंदेली, योगेश मिश्र, ओमप्रकाश तिवारी, बसंत आर्य, प्रमिला शर्मा या कवींनी त्यांच्या रचना प्रस्तुत करून उपस्थित हजारो श्रोत्यांचे मनोरंजन केले.

कार्यक्रमाला भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, ईश्वरभाई पटेल, प्रमोद चौधरी, समीर अग्रवाल, राम खरपुरिया, भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, बीना गोगरी, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, अनिता पाटील, संतोष शर्मा आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवीन खरे यांनी केले. जागृत फाऊंडेशन संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर खरपुरिया, सचीव शिवमकुमार सिंह, कोषाध्यक्ष भावेश अंकोलिया, जयेश गोगरी, रंजन शर्मा, राजेश सिंह, ललित चौधरी, चन्द्रभान सिंह, विपुल अग्रवाल यांच्या प्रयत्नाने कार्यक्रम यशस्वीपणे झाला.



# ज्येष्ठ नागरिकांसाठी अभिनव शाळा

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेलच्या डॉ. नंदकुमार मारूती जाधव फाऊंडेशनतर्फे ज्येष्ठ नागरिकांची अभिनव शाळा लवकरच सुरू होणार आहे. ही शाळा अनिवासी असणार आहे.

या शाळेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना शाळेची वेळ सकाळची असून त्यांना बसची सुविधा उपलब्ध असेल, आवश्यकतेनुसार नाश्ता व दुपारच्या जेवणाची सोय, शाळेच्या वेळेत ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पूर्णवेळ नर्स आणि आवश्यकतेनुसार डॉक्टरची सुविधा, सुसज्ज ग्रंथालय, खेळाची व करमणुकीची साधणे, उत्तम बेड व बैठकीची व्यवस्था, योग व प्राणायम शिक्षणाची सुविधा, सुप्त कला गुणांना संधी, अनुभवी व तज्ञ मार्गदर्शक, अल्प देखभाल शुल्क तसेच कौटुंबिक अडचणीवेळी अथवा कौटुंबिक आवश्यकेनुसार ज्येष्ठ नागरिकांच्या तात्पुरत्या वसतीगृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी ८६५७००३४४५ या मोबाईलवर संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. नंदकुमार मारूती जाधव फाऊंडेशनतर्फे करण्यात आले आहे.

# महिला दिनानिमित्त 'दिशा उत्सव'

**पनवेल : वार्ताहर**

दिशा महिला मंचच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त दिशा उत्सवाचे आयोजन कामोठे सेक्टर ६ येथील वामनराव पै सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्त्या इंदू झा व आर के ग्रुपचे डायरेक्टर राजेंद्र कोळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या उत्सवामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. स्वाती माने, डॉ. रुखसाना खान, डॉ. सुवर्णा माने चोपडे, डॉ. रुक्मिणी अर्जुन, डॉ,स्वाती वारे, डॉ. श्वेता गजभिये भालेराव, अनिता जंगम या डॉक्टरांना तसेच शैक्षणिक क्षेत्रातील वीणा साळवी, अर्चना जाधव व निर्मला अरोरा यांना दिशा सन्मानाने सन्मानीत करण्यात आले. तसेच या उत्सवामध्ये तुलसी ज्वेलर्स ची ज्वेलरी परिधान करून महिलांनी ज्वेलरीचा साज शृंगार आगळ्या वेगळ्या पद्धतीने सादर केला.

या वेळी विनस वूमन्स हॉस्पिटलच्या डॉ. सुवर्णा चोपडे यांनी महिलांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले तर डॉ. श्वेता गजभिये यांनी हॉस्पिटल मार्फत १५ मार्चपर्यंत गर्भवती महिलांनी नोंदणी केल्यास २० टक्के डिस्काउंट व मुलगी झाल्यास पाच हजार रुपये मुलीच्या बचत खात्यात टाकण्याचे जाहीर केले.



दिशा व्यासपीठाच्या संस्थापिका निलम आंधळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. या वेळी तुलसी ज्वेलर्स, परिवार, साई द्वारका क्लीनिक व नर्सिंग होम, सुषमा पाटील विद्यालय व जुनिअर कॉलेज कामोठे, आरोही सामाजिक विकास प्रतिष्ठानचे विशेष सहकार्य मिळाले तसेच या वेळी कुटे ग्रुप कडून महिलांना गिफ्टही देण्यात आले.

संस्थेच्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच व्यासपीठाच्या सेक्रेटरी खुशी सावर्डेकर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.




**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस, कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयाला २५ वर्षे झाल्याने या महाविद्यालयाचा दोन दिवसीय रौप्य वर्ष महोत्सव समारंभ आयोजित करण्यात आला होता. दरम्यान, संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, संस्थेचे सचिव एस. टी. गडदे तसेच महाविद्यालयातील एनसीसी विभागातील विद्यार्थी व प्रमुखांचे छायाचित्र.**

## संपादकीय

# 'नाटु नाटु'चा नादखुळा

ज्या क्षेत्रांना कोरोना कालखंडाच्या सावटातून बाहेर पडणे अजुनही पुरते जमलेले नाही अशा क्षेत्रांपैकी एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे चित्रपट क्षेत्र होय. त्यामुळेच येथील प्रत्येक यश या क्षेत्राशी संबंधित लोकांना मोठी उमेद देणारे ठरते. या पार्श्वभूमीवर आज दोन भारतीय चित्रपटांनी 'ऑस्कर पुरस्कारां'च्या मंचावर केलेली कामगिरी चित्रपट क्षेत्राशी संबंधितांनाच नव्हे तर तमाम भारतीयांना हर्षभरित करून गेली. यातील एक ऑस्कर पुरस्कार 'आरआरआर' या दाक्षिणात्य चित्रपटातील गाजलेल्या 'नाटु नाटु' या गाण्याला मिळाला तर दुसरा ऑस्कर 'एलिफण्ट विस्परर्स' या भारतीय लघुपटाला.

**राजामौली यांच्या 'आरआरआर'मधील 'नाटु नाटु'या गाण्याचा तर गेले कित्येक दिवस पाश्चिमात्य मनोरंजन विश्वात गवगवाच झाला होता. 'नाटु नाटु'ने गेल्याच महिन्यात प्रतिष्ठेचा 'गोल्डन ग्लोब' पुरस्कार आणि क्रिटिक्स चॉइस अवॉर्डही पटकावल्यानंतर यंदाच्या ९५व्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात 'बेस्ट ओरिजिनल साँग'साठीचा पुरस्कार 'आरआरआर'लाच मिळणार याची खात्री अनेकांना वाटतच होती. त्यातच प्रत्यक्ष ऑस्कर सोहळ्यात राहुल सिप्लीगुंज आणि कालभैरवा या गायकद्वयीने हे गाणे सादर केले आणि त्यावर पूर्णत: नजरबंदी करणारा जो नृत्याविष्कार सादर झाला, त्याने लॉस एंजलिसच्या दिमाखदार डॉल्बी सभागृहातील प्रेक्षक इतके भारावून गेले की अगदी स्वाभाविकपणे या नृत्याविष्काराला सगळ्यांनी उभे राहून मानवंदना दिली. त्यानंतर पुरस्कारासाठी 'नाटु नाटु'च्या नावाचा पुकारा होणे काहिसे अपेक्षितच होते. मात्र २०२३च्या ऑस्कर पुरस्कारांवर भारताचे नाव त्याआधीच कोरले गेले होते, ते लघुपट 'एलिफंट विस्परर्स'मुळे. सर्वोत्कृष्ट लघुपटासाठीचा ऑस्कर पटकावणारा हा लघुपटही दक्षिण भारताशीच संबंधित आहे. हत्ती हा दक्षिण भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. दक्षिण भारतातील केरळ या राज्यातील जंगलात राहणारे बोम्मन आणि बेली हे जोडपे रानटी हत्तींना कसे अगदी आईबापाच्या मायेने सांभाळते याची सत्यकहाणी या लघुपटातून सांगितली आहे. अवघी सृष्टी ही आपल्याच उपभोगासाठी आहे असे गृहित धरून मानवाने गेली हजारो वर्षे निसर्गसंपत्तीची लयलूट केल्याची फळे आपण आता भोगू लागलो आहोत. त्यामुळेच अन्य प्राण्यांसह आपण सारेच या सृष्टीचा एक भाग आहोत हा संदेश देणारा हा लघुपट महत्त्वाचा ठरतो. कार्तिकी गोन्साल्विस आणि गुणित मोंगा यांनी नेटफ्लिक्सकरिता बनविलेला हा लघुपट आता सगळ्यांनी आवर्जून पहायला हवा. 'आरआरआर'च्या बाबतीत मात्र असे आवाहन करण्याची अजिबात गरज नाही. इतके अफाट यश या चित्रपटाने अवघ्या देशभरात कमावले आहे. कोरोनाच्या विळख्यातून देश पुरता बाहेरही पडला नव्हता तेव्हा गेल्या २५ मार्चला तमिळ, तेलुगु, हिंदी, मल्याळम आणि कन्नड इतक्या भाषांतून 'आरआरआर' रीलीज झाला. कोरोना काळात प्रेक्षकांची थिएटरमध्ये जाऊन चित्रपट पाहण्याची सवय पार सुटली होती. अशात निव्वळ दक्षिणेतच नव्हे तर हिंदी भाषिक पट्ट्यातही बॉक्स ऑफिसवर तुफान कामगिरी करीत पुढे जागतिक स्तरावरही हा चित्रपट १००० कोटींच्या पुढची कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या गोटात शिरकाव करता झाला. राजामौली यांनी दिग्दर्शित केलेल्या 'आरआरआर'मधील 'नाटु नाटु'ची एनर्जी, त्याचे ठेका धरायला लावणारे संगीत आता जगाच्या कानाकोपऱ्यातील नृत्यप्रेमींना नादावते आहे. ऑस्कर पुरस्कारामुळे जगभराच्या नजरा आता भारतीय चित्रपट संगीताकडे अधिक प्रेमभराने वळतील यात शंका नाही.**

# तळीये दरडग्रस्तांसाठी घरे उभारण्याचे काम सुरू



**खबरबात**
**महेश शिंदे**

२२ जुलै २०२१ रायगड जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी झाली. नैसर्गिक प्रकोपाला संपूर्ण जिल्हा बळी पडला. त्याचवेळी महाड तालुक्यातील दुर्गम भागात असलेल्या तळीये गावावर दरड कोसळली. या दरडीच्या ढिगाऱ्याखाली ६६ घरे गाडली जाऊन ८७ जणांना आपला जीव गमवावा लागला. या दुर्घटनेनंतर तळीये गावाच्या पुनर्वसनाचे काम प्रशासनाने जोमाने सुरू केले. म्हाडाच्या माध्यमातून दरडग्रस्तांसाठी घरे उभारण्याचे काम सुरू असून सर्व घरांचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी ठेकेदाराकडून वारंवार मुदत वाढवली जात असल्याने ग्रामस्थांना गृहप्रवेश करण्यासाठी थोडी प्रतीक्षा करावी लागणार असल्याची शक्यता आहे.

तळीये येथील दरडग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम जरी सुरू करण्यात आले असले तरी काम अद्याप पूण न झाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. म्हाडाच्या ट्रांसकॉन डेव्हलपर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या माध्यामतून दरडग्रस्तांची घरे उभारण्याचे काम केले जात आहे. २७१ घरांसह शाळा इमारत, रस्ते, पाणीपुरवठा, समाजमंदिर बांधले जात आहे. आतापर्यंत १७ घरांची कामे झाली आहेत, तर १०० घरांच्या जोत्याची कामे झाली आहेत. त्या ठिकाणी एकूण २७१ घरे उभारण्यात येणार आहेत, ही घरे २०२३ पर्यंत पूर्ण होऊन बाधित कुटुंबे आपल्या नवीन घरात राहायला जातील असा विश्वास संबंधित ठेकेदाराकडून व्यक्त केला जात आहे. सध्या कंटेनरमध्ये राहत असलेली २५ कुटुंबे मार्च अखेर तर उर्वरित ४१ कुटुंबीयांना प्राधान्याने लवकरात लवकर घरे बांधून देण्यात यावी, अशी ग्रामस्थांनी मागणी केली आहे.

सुरुवातीला ज्या ठिकाणी गाव अस्तित्वात होते त्या ठिकाणी पुनर्वसन करावे असा आग्रह धरण्यात आला होता, परंतु त्या ठिकाणी पुन्हा दरडी कोसळण्याचा धोका असल्यामुळे गावापासून थोड्या अंतरावर जवळच पुनर्वसनाकरिता जागा संपादित करण्यात आली. याठिकाणी ६६ कुटुंबे नष्ट झाली आणि उर्वरित कुटुंबांचे प्रचंड नुकसान झाले त्यामुळे एकूण २७१ घरे राज्य सरकारच्या प्रयत्नातुन उभी करण्याचे काम सुरू आहे. प्रत्येक कुटुंबाला ६२३ चौरस फूट क्षेत्राची घरे देण्यात येतील. ही घरे नैसर्गिक आपत्तीचा सामना करणारी भूकंपावरोधक शिवाय तापमानाचे संतुलन राखणारे असतील याकरिता घरांच्या छपराकरिता पफ पॅनलचा वापर करण्यात येत आहे. म्हाडाने घरे उभारण्याचे काम ट्रान्सकॉन डेव्हलपर प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला दिले असून आत्तापर्यंत १२० घरांचा पाया व भिंती उभारण्याचे काम सुरू करण्यात आला आहे. या महिना अखेर २०० घरांचे प्राथमिक काम पूर्ण होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

घरे बांधण्याचे काम म्हाडाने घेतले असले तरी मूलभूत सुविधा पुरवण्याची जबाबदारी राज्य शासनाने घेतली आहे. यामध्ये पाणीपुरवठा, रस्ते व्यवस्थापन, शाळा, अंगणवाडी, समाज मंदिर, आरोग्य सुविधा इत्यादींचा समावेश आहे. मुळात काम सुरू करताना कंटेनरमध्ये राहत असलेल्या कुटुंबीयांना जानेवारी अखेर नवीन घरे मिळतील असे सांगण्यात आले होते, परंतु प्रत्यक्षात फक्त सतरा जणांची प्राथमिक उभारणी करण्यात आली आहे. यामध्ये आतील कामे वीजपुरवठा, पाणीपुरवठा इत्यादी सोयी सुविधांची कामे अपूर्ण असल्याची माहिती तांदलेकर यांनी दिली. तसेच दिवाळीपूर्वी घरांचा ताबा मिळणे कठिण असल्याचे कामाची गती यावरून दिसून येत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र एकंदर कामाची गती आणि दोन महिन्यांवर येऊन ठेपलेला पावसाळा पाहता तळीयेकरांना गृहप्रवेशासाठी प्रतीक्षा करावी करावी लागणार असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

# उन्हात सुमधूर नीरा भागवतेय प्रवाशांची तहान

सध्या उन्हाचा पारा ३६ अंशापर्यंत गेलेला आहे. त्यात महामार्गावरून जाताना मात्र उन्हासोबत तापलेल्या रस्त्याचे चटके बसत असल्याने नागरिक हैराण आहेत.सायन पनवेल महामार्गावरून जाणाऱ्या अशा नागरिकांना सध्या सुमधूर नीरा तहान भागवत आहे. वाशी पासून ते पनवेलपर्यंत नीरा विक्रीचे स्टोल लागलेले दिसत असून नागरिक वाहने पार्क करून निराचा आस्वाद घेताना दिसत आहेत.

नारळाच्या पाण्यासोबत नीरा हे पेयदेखील निसर्गाचा चमत्कार समजला जातो. ताड, माड, खजुरी, शिंदी या झाडांमधून पाझरणारा हा द्रव माणसाला पोषक आणि उपायकारक ठरत आहे. या द्रवालाच 'नीरा' असे संबोधले जाते.अनेकांना ही ताडी अथवा माडी म्हणजे नशा आणणारे पेय वाटते. त्यामुळे नव्याने पिणारे अनेकजण काहीसे संशयानेच हे पेय पिताना दिसतात.मात्र एकदा मधुर निरेचा घोट पोटात गेला की नाही म्हणणारा ग्राहक हक्काने दोन ग्लास जादा पितो इतके हे पेय लज्ञतदार व शरीराला तजेला देणारे आहे. जिथे ताड, माड, खजुरी, शिंदी ही झाडं उपलब्ध आहेत, अशी गावं, तालुक्यांमध्ये तसच आसपासच्या मोठमोठ्या शहरांमध्ये नीरा विकण्यासाठी केंद्रं उभारण्यात




आली आहेत.कोकणात हे पेय जास्तप्रमाणा त आढळते. सर्वत्र शीतपेयं, सरबतं, लस्सी, ताक यांसारखे तहान भागवण्याचे अनेक पर्याय सहज उपलब्ध होऊ लागल्याने काळाच्या ओघात या केंद्रांची संख्या मात्र खूपच कमी होत गेली होती, मात्र सायन पनवेल या महाराष्ट्रातील सर्वाधिक वर्दळीच्या महामार्गावर शासनाने नीरा विक्री करण्यास दिलेल्या मुभेमुळे या नीरा विक्रेत्यांना अच्छे दिन आलेले आहेत.

नीरा प्यायल्यावर तरतरी, तजेला वाटतो. निरेची पौष्टिकता तिच्यातील फॉस्फरस, लोह, साखर, जीवनसत्व 'क', 'ब १' 'ब २' आणि नायसिनवर अवलंबून असते. त्यात घालण्यात येणाऱ्या खाण्याच्या चुन्यामुळे शरिराला कॅल्शिअमदेखील मिळते. अनेक अपायांवर व त्वचेच्या विकारांवर औषधी गुणधर्म असलेल्या निरेचा फायदा होतो. त्यामुळे नीरा हे पेय महागड्या कृत्रिम शितपेयांच्या तुलनेत आपल्या वैशिष्ठयपूर्ण चवीमुळे व स्वस्त किमतीमुळे तग धरून आहे.

नीरा ही सूर्योदयापूर्वी काढली जाते. कारण झाडाला बांधण्यात आलेल्या मडक्यामध्ये गोळा झालेल्या निरेवर सूर्यकिरण पडताच ती आंबण्याची क्रिया सुरू होते. या आंबण्याच्या प्रक्रियेदरम्यान ही मौल्यवान जीवनसत्त्व नष्ट होतात, शिवाय ती शरीराला अपयायकारही ठरतात. भारत हा एकमेव देश आहे की, जिथे नीरेचा पेय म्हणून उपयोग केला जातो.

**–पुरूषोत्तम**

## बदलते तंत्रज्ञान

# 'हे' १० अंकी मोबाईल नंबर होणार बंद! वाचा सविस्तर

काही दिवसापासून अनेकांना मार्केट कंपन्यांचे फोन येत आहेत. यामुळे अनेकांनी ट्रायकडे या संदर्भात तक्रारी केल्या आहेत, आता यावर ट्रायने कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. टेलीमार्केटिंग कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ट्रायने नवा नियम जारी केला आहे. त्यानुसार १० अंकी नोंदणी नसलेले मोबाईल क्रमांक येत्या ५ दिवसात बंद होतील. अनोंदणीकृत मोबाईल नंबरवरून कॉल करण्यावर बंदी घालण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पुढील ५ दिवसांत, १० अंकी प्रचारात्मक संदेश, जे प्रमोशनल कॉलिंगसाठी वापरले जातात, ते बंद केले जाणार असल्याचे एका अहवालात म्हटले आहे. त्यामुळे मार्केटिंगचे येणार कॉल बंद होणार आहेत.




ट्रायने वापरकर्त्यांना त्रासदायक प्रमोशनल मेसेज आणि कॉल करण्याविरोधात कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. '१० अंकी मोबाईल प्रमोशनसाठी वापरता येणार नाही. सामान्य कॉल्स आणि प्रमोशनल कॉल्ससाठी वेगवेगळ्या प्रकारचे नंबर जारी केले जातात. यामुळे सामान्य कॉल आणि जाहीरातीसाठी केलेले कॉल ओळखले जातात. काही टेलिकॉम कंपन्या नियमांच्या विरोधात १० अंकी मोबाइल नंबरवरून प्रचारात्मक संदेश आणि कॉल करत आहेत, असं एका अहवालात म्हटले आहे. ट्रायच्या नव्या आदेशानुसार, सर्व दूरसंचार सेवा पुरवठादारांना ५ दिवसांत नियम लागू करावे लागतील. यानंतर, नियमांचे उल्लंघन केलेले दिसल्यास जाहीरातीसाठी कॉल करणारा १० अंकी क्रमांक पाच दिवसांच्या आत बंद केला जाईल.

जर तुम्ही प्रमोशनल कॉलिंगसाठी १० अंकी मोबाइल नंबर वापरत असाल, तर असे करणे नियमांचे उल्लंघन आहे, आता इतून पुढे हे नंबर वापरता येणार नाहीत. अन्यथा पुढील पाच दिवसांत तुमचा मोबाईल नंबर ब्लॉक केला जाईल. टेलीमार्केटिंग कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या वापरकर्त्यांनी वैयक्तिक मोबाइल नंबरवरून कॉल करू नयेत, असा सल्ला दिला जातो. त्याऐवजी, वापरकर्त्यांनी कंपनीच्या नोंदणीकृत मोबाइल नंबरवरून जाहीरातीसाठी कॉलिंग करावे. १० अंकी नंबर विना नोंदणीकृत वापरल्यास तो पुढील पाच दिवस बंद केली जाणार आहे.

वापरकर्त्यांनी गेल्या काही दिवसापासून या संदर्भात तक्रारी केल्या आहेत. आता ट्राय या संदर्भात कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. बँक, तसेच मार्केटमधील काही प्रोडक्ट मार्केटींगसाठी या कॉलचा वापर करत आहेत. वापरकर्त्यांना कधीही फोन करून डिस्टर्ब केले जात आहे. यावर आता हा मोठा निर्णय ट्रायने घेतला आहे.

# ज्ञानपीठ विजेते कवी विंदा करंदीकर

**निमित्त**



विंदा ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित गेली ६५ वर्षे साहित्यक्षेत्रात आहेत. कवी, साहित्यिक, भाषांतरकार, निबंधकार अशा विविधांगांनी वावरणारे गोविंद विनायक करंदीकर उर्फ विंदा करंदीकर यांचा 'ज्ञानपीठ पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. आज विंदा करंदीकर यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

भारतातील ज्ञानपीठ सारखा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे वि. स. खांडेकर आणि वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यानंतर विंदा मराठी साहित्यातील तिसरे साहित्यिक आहेत. भारतीय साहित्य क्षेत्रातील हा बहुमान खरं तर त्यांना केव्हाच मिळायला हवा होता, पण उशिराने का होईना त्यांचा योग्य तोच सन्मान झाल्याची प्रतिक्रिया साहित्य वर्तुळात उमटली.

ज्येष्ठ विचारवंत एल. एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार निवड समितीची बैठक शनिवारी दिल्लीत पार पडली आणि लगेचच रविवारी ह्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. पाच लाख रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. 'रसिकांनी मला भरभरून प्रेम दिले. माझ्यादृष्टीने रसिकांचे प्रेम हाच खरा सन्मान आहे. पुरस्कार वगैरे उपचार असतात. हा पुरस्कार म्हणजे माझ्या एकटयाचा सन्मान नाही, तर मराठी भाषा, कविता आणि काव्य परंपरेचा हा सन्मान आहे,' अशा शब्दांत विंदांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

काव्यवाचनाचा प्रकार फारसा रूढ नसतानाही वसंत बापट, मंगेश पाडगावकर आणि विंदा या तिघांनी काव्यवाचनाच्या जाहीर कार्यक्रमांचे अनेक फड रंगवले आहेत. १९४९ साली प्रथम प्रकाशित झालेल्या 'स्वेदगंगा' पासून सुरू झालेला विंदांचा साहित्यिक प्रवास 'मृद्गंध', 'धृपद', 'जातक', 'विरूपिका' आदी काव्यसंग्रह; 'स्पर्शाची पालवी' आणि 'आकाशाचा अर्थ' हे दोन लघुनिबंधसंग्रह; ज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभवा'चा अर्वाचीनीकरणाचा अभिनव प्रयोग; 'परंपरा आणि नवता' हा मराठी समीक्षालेख संग्रह; फाऊस्ट, राजा लिअर आणि ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र आदी अनुवादीत ग्रंथ.

'राणीचा बाग', 'एकदा काय झाले', 'सशाचे कान', 'एटू लोकांचा देश', 'पिशी मावशी आणि तिची भुतावळ' हे काही बालकविता संग्रह. २००३ साली प्रकाशित झालेला 'अष्टदर्शने' या संग्रहापर्यंत येऊन पोहोचतो. 'अष्टदर्शने' या संग्रहात आठ तत्त्वज्ञांचे विचार त्यांनी सोप्या रचनांमध्ये मांडले आहेत. याच संग्रहाकरता त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला आहे. आशयगर्भित पण सोपी शब्दरचना करणारे विंदा आपल्या कवितांतून वैश्विक सत्य धुंडाळत राहिले. त्यांची कविता प्रयोगशील आहे. विंदांच्या काव्यात व्यक्तिगत भावजीवनापासून सामाजिक वास्तवापर्यंतचे व्यापक अनुभव पाहायला मिळतात. विंदांना ललित पारितोषिक समितीचे क्रिटिक्स ॲवॉर्ड, सिनीयर फुलब्राईट, कबीर सन्मान, सोव्हिएत लँड नेहरू लिटररी ॲवॉर्ड, जनस्थान पुरस्कार तसेच साहित्य अकादमीची फेलोशिपही मिळाली आहे.

१९४९च्या मे महिन्यात विंदांच्या 'स्वेदगंगा' या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. 'स्वेदगंगा' या कवितासंग्रहात अंतर्भूत कवितांची सामाजिक आशयाची कविता, व्यक्तिचित्रणात्मक, प्रेमविषयक, बालजीवनविषयक, चिंतनात्मक, देवगड–राजापूरकडील बोलीभाषेतील कविता अशी वर्गवारी करता येऊ शकते. स्वेदगंगा कवितासंग्रहातून पुढील तीन कविता घेण्यात आल्या आहेत.


**(साभार : मराठीवर्ल्ड)**

## क्लिक...क्लिक...!



**खारघर : कॉंक्रिटीकरणाच्या जंगलात झाडेच दुर्मीळ होत असल्याचे वास्तव दर्शवणारे दृश्य.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर



# भोपळ्याच्या बियांचे 'हे' आहेत फायदे

भोपळ्याची भाजी स्वादिष्ट आणि आरोग्यदायी असते. तसंच भोपळ्याच्या बियादेखील आरोग्यासाठी चांगल्या असतात. या बियांमध्ये अनेक पोषक घटक असतात. यामुळे आरोग्याशी संबंधित समस्या दूर ठेवता येतात. डायबेटीस, पोटाशी संबंधित त्रास असेल तर भोपळ्याच्या बिया आवर्जून खाव्यात. याशिवाय या बियांचे आरोग्याच्या दृष्टीने अनेक फायदे आहेत. ऋटीव्ही नाइन हिंदीऋने याविषयी माहिती देणारं वृत्त प्रसिद्ध केलं आहे.

भोपळ्याच्या बिया पौष्टिक असतात. या बियांमध्ये झिंक, आरोग्यदायी फॅट्स आणि मॅग्नेशियम असतं. या बियांचं सेवन केल्यास शरीराला ऊर्जा मिळते. तसंच या बियांचा वापर सॅलड, स्मूदी, सूप आणि पास्तासारख्या अनेक पदार्थांमध्ये करता येतो. भोपळ्याच्या बियांमध्ये फायबर्स मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे पोटदुखीची समस्या दूर होते. या बियांमुळे पोटाचं आरोग्य चांगलं राहू शकतं.

भोपळ्याच्या बियांमध्ये अँटी एजिंग गुणधर्म असतात. यामुळे चेहऱ्यावरची मुरमं कमी होतात. तसंच त्वचेवरची वृद्धत्वाची लक्षणंही कमी होतात. या बियांमुळे केस चमकदार आणि मुलायम होतात. भोपळ्याच्या बियांमध्ये फायबरसह अँटीऑक्सिडंट्स असतात. यात हेल्दी फॅट्स असतात. यामुळे खराब कोलेस्टेरॉल कमी होतं. परिणामी हृदयाचं आरोग्य उत्तम राहतं. भोपळ्याच्या बियांमध्ये अँटीऑक्सिडंट्ससह अँटीइन्फ्लेमेटरी गुणधर्म असतात. यामुळे शरीरावरची सूज कमी होण्यास मदत होते. संसर्गजन्य आजारांपासूनही संरक्षण मिळतं.

भोपळ्याच्या बियांमध्ये व्हिटॅमिन ई भरपूर प्रमाणात असतं. यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. परिणामी आरोग्यविषयक समस्या दूर राहतात. या बियांमध्ये मॅग्नेशियम असतं. त्यामुळे हाडं मजबूत होतात. ब्लड शुगर लेव्हल अर्थात रक्तातली साखरेची पातळी नियंत्रणात राहते. त्यामुळे डायबेटीसच्या रुग्णांसाठी या बिया लाभदायक ठरतात. या बियांमुळे मेंदू शांत राहतो. भोपळ्याच्या बियांमध्ये प्रोटीन मुबलक प्रमाणात असतात. मूठभर बिया खाल्ल्यास दीर्घ काळ पोट भरल्यासारखं वाटतं. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी रोजच्या आहारात या बियांचा आवर्जून समावेश करू शकता.

# अंबा नदी खाडीवरील पुलासाठी ३५ कोटी निधी मंजूर

## प्रशासकीय मान्यता; युतीच्या गतिमान सरकारने जिंकली जनतेची मने

**पाली : प्रतिनिधी**

देश स्वातंत्र झाल्यापासून बेणसे पंचक्रोशीतील ग्रामस्थांचे अंबा नदी खाडीवरील अत्यंत महत्वपूर्ण व उपयुक्त असलेल्या पुलाचे स्वप्न आता प्रत्येक्षात सत्यात उतरणार आहे. या पुलासाठी तब्बल ३५ कोटीच्या भरीव निधीची मंजुरी राज्य सरकारने अर्थसंकल्पीय अधिवेशनातील बजेटमध्ये नमूद केली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागणीला अवघ्या काही महिन्यातच युती सरकारने हिरवा कंदील दाखविला आहे. त्यामुळे युतीच्या गतिमान सरकारने जनहितार्थ विकासकामांना प्रथम प्राधान्य देत जनतेची मने जिंकली असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील बेणसे, झोतिरपाडा, मुंढाणी, शिहू आणि कुहिरे या पाच ग्रामपंचायती अंबा नदी आणि खाडीमुळे ७५ वर्षांपासून दुर्गम बनल्या आहेत. तालुक्याचे ठिकाण आणि मुख्य रस्त्याला जोडणारा पुल व्हावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते उद्धव कुथे यांनी आंदोलनात्मक भूमिका घेत अंबा नदीवर दि.(२४) जानेवारी रोजी उपोषण केले होते.

पेण तालुक्यातील शिहू बेणसे ते रा.म.मा. १७ कडे जाणारा रस्ता हा रस्ते विकास योजना सन २००१–२०२१ अन्वये इ.जि.मा. ५२ चा भाग आहे. या रस्त्यावरून रा.म.मा. १७ कडे जाण्यासाठी अंबा नदी ओलांडून जावे लागते. सद्यःस्थितीत या ठिकाणी पूल नसल्याने या भागातील ग्रामस्थांना तसेच औषधोपचार घेणाऱ्यांना व विद्यार्थी कर्मचाऱ्यांना वळसा घालून तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. सदर पूलाचा फायदा शिहू, बेणसे, झोतीरपाडा, मुंढाणी, कुहीरे या गावांना व जवळपासच्या आदिवासी वाड्यांना असे १९००० ते २०००० लोकसंख्या असणाऱ्या जनतेला होणार आहे.तरी राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ से राज्य मार्ग ८७ राजारा बेणसे ते कोलेटी रस्त्यावरील आंबा नदीवरील पुल M.S.R.D.C अंतर्गत तयार करणे करिता शासनामार्फत प्रशासकीय मान्यता व आवश्यक निधी उपलब्ध करण्यात यावा अशी मागणी आ.महेंद्र दळवी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. त्या मागणी ला पुरेपुर न्याय देण्याचे काम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे.



एकेकाळी व्यापार विनिमय व दळणवळण यासाठी प्रसिद्ध असलेले बेणसे बंदर कालांतराने दुर्लक्षित होत गेले. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गापासून बेणसे अंबा नदी खाडी हाकेच्या अंतरावर आहे. मुख्य रस्त्यापासुन केवळ दिड किलो मिटर आणि तालुक्याचे ठिकाण असलेल्या पेण शहरापासुन केवळ १२ किलो मिटर लांब असलेल्या या पाच ग्राम पंचायतीतील ग्रामस्थांमध्ये अंबा नदी आणि खाडी असल्याने ४० किलो मिटर इतके अंतर पार करावे लागते. यासाठी बेणसे ते कोलेटे दरम्यान आंबा नदीवर पुल बांधावा अशी मागणी येथील ग्रामस्थ करीत होते. आज अखेर ग्रामस्थांच्या या मागणीला यश आले असून पुलाच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झालेय.

लवकरच बेणसे अंबा नदीवर पूल उभारला जाईल व पंचक्रोशीतील १९ हजार हुन अधिक नागरिकांचा वेळ, श्रम व पैसा यांची बचत होणार असल्याने नागरिक जनतेतून समाधान व्यक्त होत आहे.

### आमदार महेंद्र दळवी यांची मध्यस्थी यशस्वी

यावेळी आ. महेंद्र दळवी यांच्या यशस्वी मध्यस्थीने संबंधित प्रशासनाने उपोषणाची गांभीर्याने दखल घेऊन सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यांनतर उपोषण स्थगित केले होते. अर्थसंकल्पीय अधिवेशनात बजेटमध्ये रा.म.मा.६६ ते रा.मा.८७ रस्त्याला जोडणारा बेणसे शेतजुई ते बेणसे बंदर ते कोलेटी रस्त्यावरील अंबा नदीवर मोठया पुलाचे पोचमार्ग व भूसंपादनासह बांधकाम करण्यासाठी ग्रा. मा ३ ता. पेण जिल्हा– रायगड, अंबा नदी खाडीवरील पुलासाठी तब्बल ३५ कोटी रुपयांच्या भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते उद्धव कुथे व शेकडो ग्रामस्थांनी उभारलेले आंदोलन व सातत्याने या मागणीसाठी केलेला पाठपुरावा याचीच फलश्रुती होऊन या कामी युती सरकारने भरभरून निधी देऊन होय, आमचे गतिमान सरकार असल्याचे सिद्ध केले आहे.

**राज्य शासनाने या पुलाला वर्षभरातच मंजुरी दिली. पाच ग्रामपंचायतीच्या अंतर्गत येणाऱ्या १९ हजार लोकसंख्येच्या दृष्टीने उपयुक्त असलेल्या पुलासाठी प्रशासन दरबारी सातत्याने आम्ही पाठपुरावा सुरू होता. आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून अखेर पुलाची स्वप्नपूर्ती होत आहे. लवकरच पुलाचे स्वप्न साकारले जात आहे. त्यामुळे या विभागातील जनता आनंदित असून विकासकामाबद्दल शिंदे फडणविस सरकार यांचे आभार मानतो.**

**–उद्धव कुथे,** सामाजीक कार्यकर्ते

# 'स्थानिकांना रोजगार, विकास कामांना प्राधान्य देणार'

**मुरुड : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांनी मुरुड तालुक्याच्या विकासासाठी आतापर्यंत ८० कोटी रुपयांचा निधी खर्च करून तालुक्याचा चेहरा बदलला आहे. थोडेच दिवसात साळाव ते आगरदांडा रस्त्याचे काम सुद्धा सुरु होणार असून लोकांना मोठा दिलासा मिळणार आहे. आगामी काळात शिवसेनेतर्फे स्थानिकांना रोजगार कसा मिळेल याकडे लक्ष देणार



असून त्यादृष्टीने विकासाची पावले उचलणार आहोत, असे प्रतिपादन रायगड जिल्ह्याचे संपर्क प्रमुख प्रकाश देसाई यांनी मुरुड येथील गोल्डन स्वान येथील रिसॉर्टमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे.

या वेळी जिल्हा संघटिका शुभांगी करडे, जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, माजी नगराध्यक्ष स्नेहा पाटील, माजी नगरसेविका युगा ठाकूर, मेघाली पाटील, मुरुड शहर संघटक बाबू सुर्वे, सागर चौलकर आदी उपस्थित होते.

संपर्क प्रमुख प्रकाश देसाई पुढे म्हणाले, जर लाल फितीमध्ये कामे अडकणार असतील तर अशा अधिकारी वर्गाची गय केली जाणार नाही. मुरुड तालुक्याला न्याय मिळवून देण्यासाठी मुजोर अधिकारी वर्गाची तातडीने बदली करण्यात येणार आहे. कधी न होणारी कामे सुद्धा स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी पूर्ण करून दिली आहेत.

मुस्लिम समाजासाठी कब्रस्तान, संरक्षक भिंत बांधणे, जुन्या इमारती नवीन बांधणे आदी असंख्य कामांसाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.त्यामुळे हा समाज शिवसेनेसोबतच असणार आहे.

# दक्षिण रायगडात घरफोडी करणारी टोळी गजाआड

## ११ गुन्ह्यांची कबुली; तीन लाखांचा माल जप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

माणगाव, गोरेगाव, महाड, तसेच कोलाड पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी, दुचाकी चोरी करणाऱ्या टोळीतील सहा जणांना स्थानिक रायगड पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने (एलसीबी) अटक केली. त्यांनी ११ गुन्ह्यांची कबुली दिली आहे. या आरोपींकडून तीन लाख ११ हजार ९०० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, दोन मोबाईल, दोन दुचाकी असा माल जप्त करण्यात आला आह




विलास मोतीलाल हरजीवन (वय १९, रा. पारगाव खंडाळा, सातारा), मोबीन अतीअल्ला खान (वय २० रा. पारगाव खंडाळा, सातारा), सनी लहू पवार (वय २० रा. कात्रज बोगदा कचरा डेपो, पुणे), अनिल अंकुश काळे (वय १९ रा. सध्या पारगाव खंडाळा सातारा), सागर रामतीर्थ गौतम (वय २० रा. सध्या पारगाव खंडाळा, सातारा), राजू मोहन चव्हाण उर्फ आप्पा (रा. सिन्नर झोपडपट्टी नाशिक रोड) आशिक अटक करण्यात आलेल्या आरोपींची नवे आहेत.

त्यांनी माणगाव पोलीस ठाणा हद्दीतील सात, गोरेगाव पोलीस ठाणे हद्दीतील एक, पोलादपूर पोलीस ठाणे हद्द्दीतील एक, महाड शहर पोलिस ठाणे हद्दीतील एक, कोलाड पोलीस ठाणे हद्दीतील एक अशा ११ गुन्ह्यांची कबुली दिली आहे. माणगाव, गोरेगाव, महाड, तसेच कोलाड पोलीस ठाणे हद्दीत घरफोडी, मोटारसायल चोरीचे गुन्हे दाखल झाले होते.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून या गुन्ह्यांचा तपास करताना सीसीटीव्ही कॅमेरा, तांत्रिक विश्लेषण तसेच गोपनीय माहितीच्या आधारे मिळालेल्या माहितीनुसार पोलीस उपनिरीक्षक विकास चव्हाण, महेश कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सहा आरोपीना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता, त्यांनी ११ गुन्ह्यांची कबुली दिली.

रायगड जिल्ह्यात अनेक प्रकारचे गुन्हे घडत आहेत. याप्रकरणी पोलिसांनी दाखल गुन्ह्यातील आरोपींना त्याच तत्परतेने ताब्यात घेतले आहे. एकूणच जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांची टीम चांगले काम करत आहे. कोणताही गुन्हा असो त्याच्या मुळापर्यंत जावून तो शोधण्याचा प्रयत्न पोलीस करत आहेत.

## रायगड पोलीस कल्याण निधीकरीता बुधवारी अलिबागमध्ये 'सागर तरंग'




**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस दलांतर्गत पोलीस कल्याण निधी वृध्दींगत करण्याकरीता बुधवारी ( दि. १५) सायंकाळी ६ वाजता अलिबाग येथे 'सागर तरंग' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे उपस्थित होते.

रायगड जिल्हा पोलीस दलांतर्गत पोलीस मुख्यालय अलिबाग येथील पोलीस परेड मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. ८ वर्षाच्या प्रदिर्घ कालावधी नंतर रायगड पोलीस दलांतर्गत कल्याण निधीकरीता सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामध्ये पुष्कर श्रोत्री, नम्रता संभेराव, प्रसाद खांडेकर, गौरव मोरे, दत्तु मोरे, श्रमेश, प्रथमेश, मीरा जोशी, नवीन प्रभाकर आदी आघाडीचे मराठी कलाकार आपली कला सादर करणार आहेत. संगीत, नाट्य, नृत्य आणि हास्याची मेजवानी या कार्यक्रमातून प्रेक्षकांना मिळणार आहे.

नागरीकांच्या मनोरंजना सोबतच पोलीस कल्याण निधी वृध्दींगत करून त्यामधील प्राप्त रक्कमेच्या सहाय्याने पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच त्यांच्या कुटूंबीयाकरीता विविध लाभदायक योजनांची अंमलबजावणी करणे हा सदर कार्यक्रम आयोजीत करण्यामागचा उद्देश , असल्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या तिकीटाकरीता रायगड जिल्हयातील नजीकच्या पोलीस ठाणेस संपर्क साधवा. रायगड जिल्ह्यातील जास्तितजास्त लोकांनी हा कार्यक्रम पाहण्यासाठी यावे असे आवाहन रायगड पोलीस अधीक्षक सहभाग सोमनाथ घार्गे व रायगडचे अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे हानी केले आहे.

# कर्जतमधील मोधळे कुटुंब शिवसेनेत



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषद हद्दीमधील मुद्रे भागातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यकर्ते मोधळे कुटुंबाने शिवसेनेत प्रवेश केला आहे.कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत मोधळे कुटुंबियांचे पक्षात स्वागत केले.

मोधळे कुटुंब हे गेली अनेक वर्षे शिवसेना पक्षात सक्रियपणे काम करायचे. शिवसेनेतील फुटीनंतर देखील ते उद्धव ठाकरे यांच्या गटात कायम राहिले होते. मात्र कर्जत शहरातील मुद्रे भागातील अनेक निष्ठावंत शिवसैनिकांनी शिवसेना शिंदे गटात जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मुद्रे गावातील सर्वात मोठे असलेले मोधळे कुटुंब यांनी शिवसेना पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.त्यावेळी शिवसेनेचे कर्जत शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, विभाग प्रमुख नदीम खान कर्जत नगरपरिषदेचे स्वीकृत नगरसेवक संकेत भासे आदींसह शहरातील कार्यकर्ते उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ९६ सन २०२२-२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन – ४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी–१ नमुन्यातील निविदा ई– निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे परिसरात अनुसूचित जाती जमातींच्या मुलींकरिता वसतीगृह इमारतीचे बांधकाम करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड **(अनामत)** | ५७३५२०७०/– | २,८७०००/– | ३५४०/– | १८ महिने |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे शिक्षक प्रशिक्षण केंद्र इमारत बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड **(अनामत)** | २२०४९२२५/– | १५००००/– | २३६०/– | १८ महिने |
| ३ | भाले जावटे रस्ता प्रजिमा – ३८ कि.मी. ४९/०० ते ५२/२०० मध्ये रुंदीकरण व डांबरी करण करणे. (३.७५ ते ५.५० मी.) तालुका माणगांव जिल्हा रायगड (५०५४ मार्ग व पुल ०४ जिल्हा व इतर मार्ग) | १७५८१०२८/– | १५००००/– | ११८०/– | १२ महिने |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **१३/०३/२०२३ (सकाळी १०.०० पासून)** ते दिनांक **२७/०३/२०२३ वेळ १८.००** वाजेपर्यंत |
| २ | निविदापूर्व बैठक | अ.क्र. १ चे काम मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग कोकण मर्झबान रोड, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२१/०३/२०२३ वेळ १२.०० वाजता** अ.क्र. २ व ३ चे काम, अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२१/०३/२०२३ वेळ १५.०० वाजता** |
| ३ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड (सा.बां.) मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात दिनांक **२९/०३/२०२३** वेळ १२.०० वाजता |

**टिप :–** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/११८०**
**दिनांक : ०९/०३/२०२३**



**कर्जत नगरपरिषद, कर्जत जि. रायगड.**

**ई–निवीदा सूचना (बांधकाम विभाग)**

जावक क्रमांक / कनप / बांधकाम विभाग / ८२६/२३–२४ दि. १०/०३/२०२३

**कर्जत नगरपरिषदेच्या वतीने कर्जत नगरपालिका हद्दीतील खालील प्रमाणे विकास कामे करुन घेण्याची आहेत. करिता इच्छुक ठेकेदाराकडुन ई निविदा मागविणेंत येत आहेत.**

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | कर्जत नगरपरिषद वॉर्ड क्र. ८मधील उल्हासनदीवर कैचीघाट तयार करणे व शनिमंदिराच्या बाजूला उद्यान बनविणे. | ४९,९५,२२२/– |
| २ | कर्जत स्मशानभुमी सुशोभिकरण करणे. (शोकसभा मंडप व बैठक व्यवस्था, ऑफीस, अंतर्गत रस्ते व बगीचे मेनगेट, सुरक्षा भिंत, दशक्रिया विधी मंडप व अस्थी विसर्जन घाट बांधणे, इत्यादी कामे.) | १,४९,६४,३६०/– |
| ३ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील अभिनव शाहेच्या शेजारील कडू चाळ येथे अंतर्गत रस्ता व गटारे तयार करणे. ता. कर्जत | १९,८८,९७६/– |
| ४ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील शनि मंदिर ते दर्गा पर्यंत रस्ता सुशोभीकरण करणे. ता. कर्जत | ९०,४१,६०१/– |
| ५ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराजनगर येथील बंदिस्त गटारे तयार करणे. ता. कर्जत | २९,८७,४६५/– |
| ६ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील HP पेट्रोल पंपवाडी ते विशाल बैलमारे यांच्या घरापर्यंत रस्ता व गटारे तयार करणे ता. कर्जत | २४,८३,३१७/– |
| ७ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील फाटक सर ते प्रसाद गायकवडयांच्या घरापर्यंत रस्ता व गटार तयार करणे ता. कर्जत | १४,७५,९७६/– |
| ८ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील नाना मास्तर नगर येथील मोहन देशमुख यांच्या घरापर्यंत जाणारा रस्ता ते कक्कूज फार्म यांच्या पर्यंत रस्ता बनविणे टीए. कर्जत | १९,७२,३८६/– |
| ९ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील सेवालाल नगर येथे अंतर्गत गटारे तयार करणे. ता. कर्जत | २४,३२,३९७/– |
| १० | कर्जत नगरपरिषद हद्दीतील अंकुश बोंबे यांच्या घरासमोरील रस्ता बनविणे. ता. कर्जत | १९,६८,२७५/– |
| ११ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील शाळेपर्यंतहद्दीतील अओम अरुणोदय अपार्टमेंट ते शिशुमंदिर जाणाऱ्या नाल्यावर ओपन जीम व वाचन कट्टा तयार करणे. ता. कर्जत | २०,३७,१८५/– |
| १२ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील मुद्रे येथे छत्रपती स्मारकाजवळ संरक्षण भिंत बांधणे व शेड बांधणे. | १४,६९,७२५/– |
| १३ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील भिसेगाव येथे अंतर्गत रस्ता तयार करणे. | २४,३२,२६८/– |
| १४ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील शिवाजी नगर येथे वैद्य आवळा सुपारी पर्यंत रस्ता तयार करणे. | २०,००,४३७/– |
| १५ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील विशाल अपार्टमेंट समोरील रस्त्यालगत सुशोभीकरण करणे. ता. कर्जत | ९९,८९,२९४/– |
| १६ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील सुनील चिक्की ते भोईर यांच्या हॉटेल पर्यंत रस्ते व गटारे तयार करणे. | ३९,२७,१४०/– |
| १७ | कर्जत नगरपरिषद हद्दीतील गुरव आळी येथील अंतर्गत रस्ता तयार करणे. ता. कर्जत | १०,००,२१३/– |
| १८ | कर्जत नगरपरिषद वॉर्ड क्र. ३ दहिवली येथील धनंजय मेढी ते कॉसमॉस बिल्डींगकडे जाणारा रस्ता व गटार बांधणे. | ४९,५८,६४९/– |

सदर कामाची ई–निविदा, अटी व शर्ती आवश्यक असणारी कागदपत्रे, शुध्दीपत्रक व इतर तपशिलासह सविस्तर माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक १४/०३/२०२३ ते दि. ०६/०४/२०२३ या कालावधीत उपलब्ध होईल. त्याकामी इच्छुक ठेकेदारा कडुन निविदा मागविणेंत येत आहेत.

**सही/–**
**(वैभव गारवे)**
मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद, कर्जत

**सही/–**
**(सुवर्णा जोशी )**
अध्यक्षा
कर्जत नगरपरिषद, कर्जत

# नवी मुंबईतील कामांसंदर्भात उद्या बैठक

## महापालिकेच्या कारभाराविरोधातील भाजपचे उपोषण स्थगित

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील ठराविक विभागात अनावश्यक शेकडो कोटींची कामे काढली जात आहे. या विरोधात सातत्याने आवाज उठवण्यात येत असतानाच आता माजी नगरसेवकांची कामे केली जात नसल्याचे चित्र नवी मुंबईत दिसू लागले आहे. वाशी येथील भाजपचे विजय वाळुंज व माजी नगरसेविका अंजली वाळुंज यांनी थेट पालिकेच्या या कारभारविरोधात रविवारी (दि. १२) साखळी उपोषण केले.




आपल्या विभागातील अत्यावश्यक पाणी, सिव्हरेज, पादचारी पुल, उद्याने-मैदानांची अशी अनेक आवश्यक कामे प्रशासनाकडून करण्यात येत नसून अनावश्यक कामे मात्र गतीने केली जात असल्याचा आरोप या वेळी वाळुंज यांनी केला. अखेर संदीप नाईक यांनी मध्यस्ती केल्याने व पालिकेने कामे करण्याचे आश्वासन दिल्याने हे उपोषण समाप्त केले.

शहर अभियंता संजय देसाई यांच्याशी संदीप नाईक यांनी तसेच महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याशी संजीव नाईक यांनी संपर्क साधल्यानंतर काही कामे तत्काळ मान्य करण्यात आली. तसेच बुधवारी (दि. १५) विशेष बैठक घेऊन इतर कामांबाबत चर्चा करून तोडगा काढण्याचे आश्वासन पालिकेकडून वाळुंज यांना देण्यात आले. तसे पत्र प्रशासनाने दिले. यानंतर संजीव नाईक यांच्या हस्ते पाणी पीऊन विजय वाळुंज व अंजली वाळुंज यांनी उपोषण स्थगित केले.

या आंदोलनाला माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी सभापती संपत शेवाळे तसेच विभागातील नागरिक उपस्थित होते.

**तोडगा न निघाल्यास आंदोलन तीव्र**

**जर कामे होणार नसतील आणि बैठकीत तोडगा न निघाल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल व महापालिका मुख्यालय या ठिकाणी उपोषण तसेच प्रसंगी रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल. त्याचप्रमाणे आंदोलन स्थगित करण्यात आले असून संपले नसल्याबद्दल विजय वाळुंज यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे.**

# नवी मुंबईतील भूमिपुत्रांचा तीनपट मालमत्ता कर रद्द

## आमदार मंदा म्हात्रे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील गरजेपोटी बांधलेल्या ग्रामस्थांच्या सुमारे ५,००० घरांना लावण्यात आलेला तीन पट मालमत्ता कर रद्द करण्यात यावा, याकरिता बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी विधानसभेत आवाज उठवला होता तसेच सदरबाबत सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला होता.

आमदार मंदा म्हात्रेंच्या सततच्या पाठपुराव्याला यश आले असून याबाबत नगरविकास विभागाने नवी मुंबई महापालिकेला निर्देश दिले आहेत. यामुळे नवी मुंबईतील ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबतचे पत्र नगरविकास विभागाने नवी मुंबई महापालिका आयुक्तांना पाठवले आहे.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की,



नवी मुंबईतील २९ गावातल्या गरजेपोटी बांधलेल्या घरांना नवी मुंबई महापालिकेने तीन पट टॅक्स लावला होता तर रकमेवर १८ टक्के व्याज आकारला जात होता. नवी मुंबईतील अशा पाच हजार घरांना पालिकेमार्फत नोटीसा पाठवल्या गेल्या. आपल्या देशात समान कायदा आहे, असे असताना महापालिका क्षेत्रातील इतर घरांना वेगळा कर व ग्रामस्थांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांना वेगळा कर हा प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांवर अन्याय आहे. नवी मुंबईतील स्थानिक प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी नवी मुंबई शहर वसविताना आपल्या १०० टक्के जमिनी दिल्या आहेत. त्यांच्याच स्वतःच्या मालकी जमिनीवर बांधलेल्या घरांना लावण्यात आलेला तीन पट मालमत्ता कर रद्द करण्याची तसेच त्यावर लावण्यात आलेला १८ टक्के व्याज व दंड माफ करण्याची आवश्यकता होती. त्यावेळी नवी मुंबईतील गरजेपोटी बांधलेल्या ग्रामस्थांच्या घरांना लावण्यात आलेला तीन पट मालमत्ता कर रद्द करण्यात यावा, यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घातले होते तर नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात विधानसभेत मागणी केली होती.

याबाबत सातत्याने पाठपुरावा केला असता मालमत्ता कर रद्द करण्याबाबत नगरविकास विभागाकडून महापालिकेला निर्देश देण्यात आले आहेत.

# पोस्ट ऑफिसमध्ये आरओ वॉटर मशीन भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

शिवसेना जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांचा जन्मदिनानिमित्त कोपरखैरणे येथील पोस्ट ऑफिसमधील पोस्ट कर्मचारी यांच्यासाठी शुद्ध पाणी पिण्यासाठी आरओ मशीन व थंड, गरम पाणी पिण्यासाठी मशीन देण्यात आले.



पोस्ट कर्मचाऱ्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी व्यवस्था नव्हती. ही बाब कर्मचाऱ्यांनी शिवसेनेच्या सह संपर्क प्रमुख सचिन कांबळे यांच्या कानावर घातली. सचिन कांबळे यांनी या आवश्यक बाबीची दखल घेत कोपरखैरणे पोस्ट कार्यालयास मशीन भेट दिले. या प्रसंगी खुद्द विजय चौगुले उपस्थित होतें यासह माजी नगरसेवक रामदास पवळे, महिला संपर्क प्रमुख दमयंती आचरे , उत्तर भारतीय जिल्हा संघटक ललित झा व आदी पदाधिकारी कारयकर्ते उपस्थित होते. ही सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल पोस्ट ऑफिसच्या कर्मचाऱ्यांनी कांबळे यांचे आभार मानले.

# 'विद्याभवन'च्या १०० विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप



**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांना स्व. दीपक शाह यांच्या स्मृतिनिमित्त मोना शाह आणि अंकित शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत न्यूट्रीडीयन ॲनिमल हेल्थ या कंपनीच्या माध्यमातून १०० विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य तसेच ७० विद्यार्थी व शिक्षकांना टी शर्ट वितरण करण्यात आले.

स्व. दीपक शाह यांनी मेहनतीने न्यूट्रीडीयन ॲनिमल हेल्थ या कंपनीची अल्पावधीत भरारी घेतली. तसेच त्यांनी सामाजिक जाणीव ही जपली. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दरवर्षी गरीब विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य आणि भोजन देऊन सामाजिक वारसा जपला जातो. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना मोफत भोजन देण्यात आले.

या कार्यक्रमासाठी न्यूट्रीडीयन ॲनिमल हेल्थ या कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक मोना शाह, गणेश जाधव, डॉ. अनिल चंदेवाल, अंकित शाह, विशाल शर्मा, व्यवसाय व्यवस्थापक गणेश जाधव, राहुल शिरकांडे, पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक भीमराव अडसूळ, राजकुमारी इंदलकर, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक, अस्मिता सलगर, शोभा लवटे सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# कोपरखैरणे येथे नेत्र रोग तपासणी शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

श्री रामकृष्ण नेत्रालय व आदित्य हेल्थ ण्ड एज्युकेशन सोसायटी, नवी मुंबई यांच्यातर्फे रविवारी (दि. १२) डॉ. प्रतिक तांबे यांच्या नवजीवन क्लिनिक कोपर खैराणे येथे मोफत नेत्र रोग तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी डॉ. प्रतिक तांबे व डॉ. विजया तांबे यांनी डोळ्यांचे आजार, उपचार व घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले.



मोबाईल, इंटरनेटचा वाढता वापर व त्यामुळे डोळ्यावर येणारा ताण, मधुमेह तसेच अनेक आजारांमुळे डोळ्यांवर होणारे दुष्परिणाम, मोतिबिंदू, विद्यार्थी तसेच तरुणांनी जास्त वेळ मोबाईल न वापरणे याबाबत समुपदेशनही केले.

या वेळी रामकृष्ण नेत्रालयमधील तज्ञ डॉक्टरांनी शेकडो नागरीकांची मोफत डोळे तपासणी केली. आदित्य हेल्थ ण्ड एज्युकेशन सोसायटी, नवी मुंबई ही सामाजिक संस्था गेली सोळा वर्ष नवी मुंबई तसेच परिसरामधे विविध आरोग्य शिबिरे घेत असून यात महिलांचे आजार, ब्रेस्ट कॅन्सर, विविध प्रकारचे कर्करोग बाबत मार्गदर्शन, मासिक पाळीबाबत तरुणींना माहीती तसेच शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी शिबिर, ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबीर घेत असते, अशी माहीती संस्थेच्या सचिव डॉ. विजया प्रतिक तांबे यांनी दिली.



**कामोठे : श्री क्षत्रिय घाँची समाज रायगड यांच्या वतीने होळी स्नेह मिलन समारंभ आयोजित करण्यात आला होता. या उत्सवाला भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांचे आयोजकांच्या वतीने स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप शहर मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, समाजाच्या वतीने घेवरचन्दजी बोराणा, मिठालालजी राठोड, शेषारामजी बोराणा आदी उपस्थित होते.**



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस, कॉमर्स अँड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयाला २५ वर्षे झाल्याने या महाविद्यालयाचा दोन दिवसीय रौप्य वर्ष महोत्सव समारंभ आयोजित करण्यात आला होता. दरम्यान, उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले त्यावेळची काही क्षणचित्रे.**

# नवी मुंबईत स्वच्छतेविषयी सकारात्मक चित्र



**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी विभागाविभागांमध्ये जाऊन प्रत्यक्ष स्वच्छता पाहणी दौरे सुरू केले असून मागील आठवडाभरात क्षेत्रीय पातळीवर स्वच्छतेविषयी अधिक सकारात्मक चित्र दिसून येत असल्याचे अभिप्राय नागरिकांकडून प्राप्त होत आहेत. त्यांनी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्यासमवेत बेलापूर विभागातील स्वच्छता कामांची बारकाईने पाहणी केली व ठिकठिकाणी थांबून स्वच्छतेविषयी मौलीक सूचना केल्या.

गणपतशेठ तांडेल मैदानाच्या कॉर्नरला मातीचे ढिगारे दिसून आल्याने आयुक्तांनी संबंधीत अधिकाऱ्यांना फैलावर घेत डेब्रीज भरारी पथके अधिक कृतीशील करण्याचे निर्देश दिले. यापुढील काळात अशाप्रकारे डेब्रीज टाकलेले आढळल्यास जबाबदारी निश्चित करण्यात येईल असेही स्पष्ट संकेत आयुक्तांनी यावेळी दिले.

सध्या पानगळीचा कालावधी असल्याने झाडांच्या पानांचा व छोट्या फांद्यांचा हरित कचरा हा रस्त्यांच्या कडेला व पदपथावर पडण्याचे प्रमाणही अधिक असल्याने तो हरित कचरा उचलण्याची कार्यवाही तत्परतेने करण्यासाठी काही दिवसांकरिता ते विशिष्ट काम करण्यासाठी पथके नेमावीत असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

दिवाळेगांव येथील मासळी मार्केटची तसेच आतमधील फिशफेड प्रकल्पाची पाहणी केल्यानंतर त्याची व्याप्ती वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. दिवाळेगांव जेट्टी तसेच त्या परिसरातील शौचालयांचीही पाहणी करून तेथील स्वच्छता व निगा अधिक चांगल्या प्रकारे राखण्याबाबतच्या सूचना आयुक्तांनी या वेळी केल्या.

**आयुक्तांकडून प्रत्यक्ष पाहणी**

**या पाहणी दौऱ्यात आयुक्तांनी सीवूड रेल्वे ब्रीज, सेक्टर ४०, ४२, करावे, गणपतशेठ तांडेल मैदान, ज्वेल ऑफ नवी मुंबई, झोटींगदेव मैदान, सेक्टर ४४, पामबीच मार्ग, दिवाळेगांव, सेक्टर ११, सेक्टर १५, कोकण भवन व आसपासचा शासकीय कार्यालय परिसर, आर्टिस्ट व्हिलेज, रमाबाई आंबेडकर नगर, सेक्टर १४ अशा विविध ठिकाणी भेटी देत स्वच्छता स्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली.**

**नागरिकांनीही स्वच्छतेबाबतचे आपले कर्तव्य पार पाडून शहराला नंबर वन बनविण्यासाठी अधिक जोमाने सहयोग द्यावा.**

**-राजेश नार्वेकर, आयुक्त, नवी मुंबई मनपा**

# राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी आज

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईसह पुणे व नाशिक केंद्रावर आयोजित प्राथमिक फेरीत राज्यभरातील ३५ बालनाट्य संस्थांनी सहभागी होत यशस्वी केलेल्या नवी मुंबई महापालिका करंडक राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेची महाअंतिम फेरी १३ व १४ मार्चला वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात उत्साहात होत आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धेच्या महाअंतिम फेरीला सोमवारी प्रारंभ झाला असून मंगळवारी (दि. १४) या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. ८ व ९ मार्च रोजी या बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी नवी मुंबई, पुणे आणि नाशिक केंद्रांवर पार पडलेली असून त्यामध्ये नवी मुंबईसह ठाणे जिल्हा, रायगड, पालघर, रत्नागिरी, नाशिक, पुणे, कोल्हापूर, जळगाव, अमरावती अशा महाराष्ट्राच्या विविध भागांमधून ३५ बालनाट्य संस्थांनी स्पर्धा सहभाग नोंदविला होता. त्यामधून नवी मुंबई केंद्रावर परीक्षक अनिकेत पाटील आणि विनोद गायकर तसेच नाशिक व पुणे केंद्रावरील परीक्षक प्रशांत विचारे यांनी १५ बालनाट्यांची अंतिम फेरीसाठी निवड केलेली आहे.

# राधाकृष्ण मंदिराचा स्थापना दिवस

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

यादव समाज ट्रस्ट आणि राधाकृष्ण मंदिराचा स्थापना दिवस रविवारी (दि. १२) कळंबोली येथे उत्साहात आणि थाटामाटात साजरा करण्यात आला.

मंदिरात सकाळपासूनच पूजा, पूजा, कीर्तन भजन सुरू झाले होते. विशेष आकर्षणाचे केंद्र ठरलेल्या सायंकाळी महिलांनी विशेष कीर्तन भजनाचे आयोजन केले होते. मंदिर संचालनालयातर्फे मुलींना कन्यापूजन व भोजन देण्यात आले. संध्याकाळी विविध ठिकाणच्या प्रतिनिधींचा आणि पाहुण्यांचा सत्कार व सत्कार करण्यात आला. या वेळी विशेषतः संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एस. बी. यादव यांचा त्यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष सत्कार आणि सन्मान करण्यात आला.

या वेळी यादव समाज ट्रस्टचे राष्ट्रीय अध्यक्ष एस. बी. यादव, महेंद्र नाथ यादव, कैलाश नाथ यादव, जितेंद्र यादव, भोलानाथ यादव, सुरेश यादव, दयाराम यादव, अमित यादव गुड्डू, राहुल उमाशंकर यादव, राजेश यादव, अशोक यादव, विजय यादव, पवन यादव, समाज ट्रस्टचे सदस्य व प्रजापती समाज विकास मंडळ रजि. चे राष्ट्रीय अध्यक्ष सी. पी. प्रजापती वरिष्ठ, उपाध्यक्ष दिनेश प्रजापती आदी उपस्थित होते. ट्रस्टच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती यामध्ये सुमारे साडेचारशे लोकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.



# नागोठणे येथे घराला आग

## सुदैवाने कोणतीही जीवितहानी नाही

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे येथील अंगार आळीमधील रहिवासी शेखर चंद्रकांत कामथे यांच्या घराला रविवार (दि.१२) रोजी शॉटसर्किटमुळे भीषण आग लागली. या आगीत घरातील वस्तू जळून खाक झाल्या.

आग लागल्याचे वृत्त समजतात ती आग आटोक्यात आणण्यासाठी आपल्या जिवाचीही पर्वा न करता अंगारआळी ग्रामस्थ नरेश कामथे, हरेश कामथे, जीवन पत्की, मयूर शिर्के, किरण पवार, अंकुश बेलोसे, राकेश कामथे यांनी धाव घेतली, रुपेश कामथे यांनी जीव धोक्यात घालून घरातील मीटर बंद केले. घरात पसरलेल्या काळोखात घरातील पुढच्या दरवाजाने काही दिसत नसल्याने मयूर शिर्के यांनी डाव्या बाजूचा दरवाजा तोडून घरात



प्रवेश केला आणि त्यानंतर बादलीच्या सहाय्याने आणि पाण्याच्या पाईपद्वारे आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला आणि नरेश कामथे यांनी स्वतःच्या जीवाचा विचार न करता किचनमधला दरवाजा तोडून सिलेंडर बंद करून तो मयूर शिर्के यांच्याकडे दिला. बंद केलेला सिलेंडर मयूर शिर्के यांनी ओला गोणता टाकून बाहेर काढला.

### ग्रामस्थांची धावपळ

विनायक गोळे यांनी संबंधित विभागाशी संपर्क साधून फायर ब्रिगेडची गाडी बोलावून घेतली. घरात अजून काही राहिले आहे का याची खात्री ग्रामस्थांनी करून घेतली. जीवाची पर्वा न करता ग्रामस्थ धावून आले.

### घरातील किचन आगीत खाक

शॉकसर्किटमुळे लागलेल्या आगीत घरातील किचन पूर्णपणे जळून खाक झाले होते. ती आग एवढी पसरली की, वरच्या लाकडाला आणि बाथरूमवर असलेल्या पाण्याच्या टाकीने पेट घेतला. हे समजताच नरेश कामथे, जीवन पत्की, रुपेश कामथे, अंकुश बेलोसे, मयूर शिर्के यांच्या मदतीमुळे ती टाकी देखील बाहेर काढण्यात आली. नंतर घरातील इलेक्ट्रिक वस्तू ग्रामस्थांच्या मदतीने बाहेर काढण्यात आल्या.

# संघटीत होऊन आपले प्रश्न सोडवू

## सुरेश मगर यांचे प्रतिपादन; रोहा तालुका कुणबी समाजाची सभा

**रोहे : प्रतिनिधी**

कुणबी समाजाच्या सर्वांनी संघटीत होऊन आपले मूलभूत व सामाजिक प्रश्न सोडवू शकतो, असे प्रतिपादन समाजाचे नेते सुरेश मगर यांनी केले.

कुणबी समजोन्नोती संघ मुंबई ग्रामीण शाखा रोहा यांची तालुका कार्यकारिणी सदस्य व सर्व ग्रुप अध्यक्ष तसेच पदाधिकारी यांच्या उपस्थितीत माजी आमदार स्व. पा. रा. सानप कुणबी भवन रोहा येथे उत्साही वातावरणात रोहा तालुकाध्यक्ष शिवराम शिंदे यांच्या उपस्थितीत कार्यकारिणीची सभा झाली. या सभेत ते बोलत होते.

यावेळी रायगड जिल्हा कुणबी समाज समन्वय समितीवर नव्याने निवड झालेले उपाध्यक्ष शंकरराव भगत, तसेच रायगड कुणबी समाज समन्वय समिती सरचिटणीसपदी शिवराम महाबळे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सत्कार करण्यात आले. त्याच बरोबर समाज नेते शंकरराव म्हसकर यांची रायगड जिल्हा कुणबी समाज समन्वय समिती सल्लारपदी तर ओबीसी रायगड जिल्हा अध्यक्ष सुरेश मगर, माजी सभापती पं.स रोहा रामचंद्र सकपाळ यांची रायगड जिल्हा कुणबी समाज समन्वय समिती कार्यकारिणी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचे देखील यावेळी सत्कार करण्यात आला.

तसेच कुणबी समाज युवक मंडळ अध्यक्ष अनंत थिटे, कुणबी चेंबर ऑफ कॉमर्स रोहा तालुका संघटक



पदी निवड झाली आहे. तसेच माजी अध्यक्ष रायगड जिल्हा कुणबी समाज युवक मंडळ महेश बामुगडे यांची कुणबी चेंबर ऑफ कॉमर्स रोहा तालुका उपसंघटकपदी निवड झाली. तसेच कुणबी चेंबर ऑफ कॉमर्स रोहा तालुका उपसंघटकपदी शशिकांत कडू निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

सभेस रोहा तालुका कुणबी समाज उपाध्यक्ष मारुती खांडेकर, उपाध्यक्ष गोपीनाथ गंभे, कुणबी समाज सरचिटणीस रोहा तालुका दत्ताराम झोलगे,माजी सरचिटणीस सुनिल ठाकुर, सुहास खरीवले, माजी अध्यक्ष कुणबी समाज मधुकर ठमके, समाज नेते बाबुराव बामणे, धाटाव ग्रुप अध्यक्ष गुणाजी पोटफोडे,ऐनघर ग्रुप अध्यक्ष यशवंत हळदे, सोनगाव ग्रुप अध्यक्ष खेळु ढमाळ, काशीनाथ भोईर,सतीश भगत, शशिकांत कडू, राजेंद्र शिंदे, यशवंत रटाटे, विष्णू लोखंडे, मोरेश्वर खरीवले, परशुराम भगत, ज्ञानेश्वर दळवी, महेश तुपकर, तुकाराम पाखर, यशवंत मोंडे आदी तालुक्यातील सर्व समाज बांधव उपस्थित होते.

यावेळी समाज नेते शंकरराव म्हसकर यांनी आपल्या मनोगतात व्यक्त करताना असे सांगितले की आपल्याला जातीच्या दाखल्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री, समाजकल्याण मंत्री यांच्या उपस्थितीत व त्यांच्या समावेत मंत्रालयात बैठक झाली पाहिजे. यासाठी कुणबी समजोन्नोती संघ मुंबईचे अध्यक्ष भुषण बरेसाहेब, तालुक्यातील आपण सर्व समाज नेत्यांनी अधिक प्रयत्न केले पाहिजे.

तसेच सभेचे अध्यक्ष रोहा तालुका कुणबी समजोन्नोती ग्रामिण शाखा अध्यक्ष शिवराम शिंदे यांनी सांगितले, कुणबी समाज शाखा कोलाड, कुणबी समाज शाखा धाटाव, विष्णू लोखंडे, कुणबी समाज चणेरे यांचे विषेश कौतुक केले.

कुणबी जोडो अभियान यशस्वी होण्यासाठी खूप मेहनत घेतली होती. यावेळी शिवराम महाबळे, शंकरराव भगत, रामचंद्र सकपाळ, अनंत थिटे, यांनी मनोगत व्यक्त केले. आभार दत्ताराम झोलगे यांनी मानले.

# रोह्यातील मेहेंदळे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा साजरा

**रोहे : प्रतीनिधी**

कामाच्या धगधगीत मुलांच्या नातवांच्या शाळा, परीक्षा, वाढते वय, आजार असताना देखील हे सर्व बाजूला ठेवून आपले गाव, आपली शाळा आणि आपण ज्या मातीत खेळलो, बागडलो त्या ज्येष्ठ ६५ वर्षाचे मेहेंदळे हायस्कूल १९७२–७३ सालच्या ११ वी बॅचचे विद्यार्थी, विद्यार्थिनी निवी येथील अक्षय लान्स येथे स्नेहमेळावा निमित्त एकत्र जमले होते.

मेहेंदळे हायस्कूलच्या ११ वी बॅचचे विद्यार्थी विवेक मळेकर, विजय देसाई, दिलीप शहा, विनायक बेडेकर, नंदकुमार शिंदे, नंदू शिंदे, स्मिता करंबे यांच्या पुढाकाराने ४० विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता. शालेय कारकीर्दीतील आठवणींना उजाळा देण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवसात निरनिराळे कार्यक्रम, भेटी, मुलांच्या परिवारांचे तसेच नोकरी व्यवसाय इत्यादी बाबींच्या विचारांची देवाणघेवाण आणि आपण ज्या मातीत वाढलो, खेळलो, बागडलो त्या मातीचा, शाळेचा गावाचा गुरुवर्यांचा अभिमान या ठिकाणी सर्वांनी दर्शवला. सर्वांनी त्या वेळच्या आठवणींना उजाळा दिला.

आज सुना, जावई, नातवंडे असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेला वंदन करून आपल्या त्या वेळच्या वर्गात जाऊन बेंचवर बसून पूर्वीचा इतिहास आठवण करून दिला. श्री धावीर महाराज मंदिर, कुंडलिका नदी, नदी संवर्धने, उद्याने उंच उंच इमारती, रेल्वे, औद्योगिक कारखाने आणि वाढलेली लोकसंख्या सर्वांना आश्चर्यकारक वाटले. जुनी कौलारू घरे वाडे दिसलेच नाहीत. या सर्व आठवणी यावेळी विद्यार्थ्यांनी जतन करत असताना नवे रूप पाहिले. एकमेकांच्या आठवणींना उजाळा देत मोठ्या आनंदात हा मेळावा विद्यार्थ्यांनी साजरा केला झाला.

# स्वच्छ विद्यालय पुरस्काराने रातवड विद्यालयाचा गौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माणगाव तालुक्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयास स्वच्छ विद्यालय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. शनिवारी कल्याण येथील झालेल्या कार्यक्रमात विद्यालयाचे मुख्याध्यापक महादेव जाधव यांनी या पुरस्काराचा स्वीकार केला.

या स्पर्धेत रातवड विद्यालयाने सर्वोत्तम कामगिरी करत पुरस्कार पटकाविला. शालांतर्गत तसेच बाह्य परिसर स्वच्छता, नीटनेटकेपणा, विद्यार्थ्यांमध्ये असणारी स्वछतेची आवड व स्वयंशिस्त या आधारे विद्यालयास पुरस्कार प्राप्त झाला आहे. संस्थेच्या २८ शाळांतून रातवड विद्यालयाने हा पुरस्कार प्राप्त केला असून विद्यालयाच्या या यशाचा आनंद शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी, विध्यार्थी व पालकांनी व्यक्त केला आहे. या पुरस्काराबद्दल विद्यालयाचे कौतुक व अभिनंदन संस्थेचे पदाधिकारी, पालक वृंद, शिक्षणप्रेमी, आजी माजी विद्यार्थी यांनी केले आहे.

# वावंढळमध्ये समता सैनिक दलाचे सैनिक शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा रायगड जिल्हा (उत्तर) च्यावतीने, समता सैनिक दलाच्या वर्धापन दिनानिमित्त एक दिवसीय समता सैनिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात भारतीय बौद्ध महासभा जिल्हा (उत्तर) च्यावतीने खालापूर तालुक्यातील चौक वावंढळ येथील तक्षशिला नगर, बुद्ध विहार येथे समता सैनिक शिबिर पार पडले. या सैनिक शिबिरामध्ये महिला, पुरुषांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून विविध प्रशिक्षण घेतले. शिबिराचे प्रमुख मार्गदर्शक विजय कांबळे (महाराष्ट्र राज्य कोषाध्यक्ष, जनरल मेजर), विजय गायकवाड (रायगड जिल्हा अध्यक्ष), अनंता गायकवाड (समता सैनिक दलमेजर), रमाताई गांगुर्डे (कंपनी कमांडर), विजय कांबळे (रायगड जिल्हा सरचिटणीस) आदी उपस्थित होते.

# गोफण खाडीतील मृतदेहाची ओळख पटविण्यात पोलिसांना यश



**रोहे : प्रतिनिधी**

रोह्यात आठवडाभरात सानेगाव विभागातील जंगलभाग व खाडीपट्यात महिला व पुरुष मृतदेह सापडल्यामुळे सर्वत्र एकच खळबळ माजली होती.पोलिसांपुढे या मृतदेहांची सर्वप्रथम ओळख पटवणे हे मोठे आव्हान होते. त्यामधील गोफण खाडीमध्ये आढळलेल्या पुरुष मृतदेहाची ओळख सोशल मिडीयाच्या माध्यमातून पटवण्यात पोलिसांना काही तासात यश आले आहे.

रोहा तालुक्यातील गोफण येथे ११ मार्च रोजी सकाळी मासेमारी करताना स्थानिक नागरिकांना खाडी पात्रात एक पुरुषाचे प्रेत तरंगताना आढळून आले. त्यानंतर रोहा पोलीस निरीक्षक घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी दाखल होत पुढील कारवाई करण्यात आली. या अज्ञात मृतदेहाची ओळख पटावी यासाठी सोशल मिडियाच्या माध्यमातून त्याचे फोटो व शारीरिक वर्णन सर्वत्र प्रसारित करण्यात आले. त्यानुसार अजगर अली वसीउल्ला खान रा. सांताक्रूझ मुंबई याचा तपास करून त्याला ओळखीसाठी रोहामध्ये बोलावून घेतले. त्यानुसार तो रोह्यात आल्यानंतर त्याने मृत शरिराची ओळख पटवत हा मयत आपला भाऊ अन्वर अली वसिउल्ला खान (वय ४५) असल्याचे सांगितले. मृतदेहाची ओळख पटल्यानंतर आता यासंबंधी पुढील कारवाई व तपास होत असल्याची माहिती पोलीस निरिक्षक प्रमोद बाबर यांनी दिली आहे.

# ‘गोकुळेश्वर तलाव अलिबागच्या वैभवात भर घालणारा ठरेल’

**अलिबाग : प्रतिनिधी**

गोकुळेश्वर तलावाचे सुशोभिकरण अलिबागच्या वैभवात भर घालणारा ठरेल, असा विश्वास रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी व्यक्त केला. तालुक्यातील वेश्वी ग्रामपंचायत हद्दीतील गोकुळेश्वर तलावाच्या सुशोभिकरणाचा भूमिपूजन सोहळा शनिवारी सायंकाळी पाच वाजता गोकुळेश्वर मंदिर येथे पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे बोलत होते. सोहोळ्याच्या अध्यक्षस्थानी आमदार महेंद्र दळवी हे होते.

कार्यक्रमाच्या व्यासपीठावर ग्रामपंचायतीचे सरपंच गणेश गावडे, माजी सरपंच नारायण वार्डे, ग्रामसेवक सुदेश राऊत, सदस्य उद्धव भितळे, वेदिका गोतावडे, रसिका मगर, ब्राईट स्टार इन्व्हेस्टमेंट प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे कार्यकारी व्यवस्थापक ओमकार कुलकर्णी, मलीगवाड फाउंडेशनचे मेकॅनिकल इंजिनियर



आनंद मलीगवाड, माजी उपसरपंच नंदकुमार कदम, सुनील गुरव, चारूहास मगर, सुधीर वेंगुर्लेकर, सीताराम पुजारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे म्हणाले की, मानव पशुपक्षांच्या अधिवासात अतिक्रमण करीत आहे. कंपनी आणि फाऊंडेशनच्या माध्यमातून हे चांगले काम होत आहे. या ऐतिहासिक तलावाला गतवैभव प्रात झाले पाहिजे. त्यामुळे लहान मुले, खेळाडू, ज्येष्ठ नागरिक, तरुण, महिला येथे नैसर्गिक वातावरणाचा आनंद घेता येईल. पुन्हा येथील निसर्गाला गतवैभव येईल. या गोकुळेश्वर तलावाचे सुशोभिकरण अलिबागच्या वैभवात भर घालणार ठरेल, असा विश्वास पोलीस अधीक्षक घार्गे यांनी व्यक्त केला.

आमदार महेंद्र दळवी पुढे म्हणाले, दोन संस्थाकडून गोकुळेश्वर तलावाचे सीएसआर निधीच्या माध्यमातून सुशोभिकरण होत आहे. वेश्वी ग्रामपंचायतीचा हा कौतुकास्पद प्रकल्प आहे. यापूर्वी या तलावाच्या सुशोभिकरणाचे अनेक वेळा नारळ फुटले मात्र सुशोभिकरण झाले नाही. एक व्हीजन ठेवून ग्रामपंचायतीतील नवनिर्वाचित सरपंच आणि सदस्य काम करीत आहेत. या विभागाचा आमदार म्हणून माझीही मोठी जबाबदारी आहे. नुकत्याच झालेल्या राज्याच्या अर्थसंकल्प अलिबागमधील विकास कामांना प्राधान्य देण्यात आले आहे. या मतदारसंघातील रस्त्यांसह मूलभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. हे गोकुळेश्वर मंदिर सुसज्ज उभारून त्याचा जीर्णाद्धार करण्यात येईल, असे आश्वासनही आ. दळवी यांनी दिले.

# वसंत ऋतू बहरला; विविधरंगी रानफुलांची होतेय उधळण

**माणगाव : प्रतिनिधी**

रानात विविध रंगांच्या फुलांनी मुक्तपणे रंगांची उधळण केली आहे. फाल्गुन महिना सुरु झाला की सर्वसामान्यांना वेध लागतात ते होलिकोत्सवाचे. भारतीय सौर वर्षातील शेवटचा सण म्हणजे होळी किंवा हुताशनी पौर्णिमा होय. फाल्गुन पौर्णिमेला होलिकोत्सव सुरू होतो आणि रंगपंचमीपर्यंत या उत्सवाची रंगत वाढत जाते. होळी, धुलीवंदन आणि रंगपंचमी या पर्वातील विशेष दिवस असतात. रंगपंचमीला विविध रंगांची उधळण करून एकमेकांना रंग लावले जातात. संपूर्ण भारतात रंगपंचमी विविध प्रकारे साजरी केली जाते. महाराष्ट्रात खास करून कोकणात रंगपंचमीच्या या पर्वात रानावनातही विविध रंगांची उधळण झालेली असते. याच काळात शिशिराची पानगळ होऊन अनेक झाडांना कोवळी पाने,पालवी यायला सुरुवात होते.

शिशिर संपून वसंत ऋतूची सुरुवात याच काळात झालेली असते. वसंत ऋतूच्या आगमनाबरोबर रानावनात विविध बदल होतात. अनेक झाडांना फुलोरा येतो. पानगळ झालेली अनेक झाडे फक्त फुलांनी नखशिखांत फुलांनी बहरलेली असतात.

या फुलांचे रंग, गंध तितकेच मोहविणारे असतात. या वर्षी पावसाळा लांबला असला तरी ऋतुनुसार रानावनात विविध फुलांचा बहर सुरू झाला आहे. रंगपंचमीच्या पर्वात रानाची शोभा वाढविणारी गंध उधळणारी ही फुले कोकणातील सह्याद्री पर्वताची शोभा असून रानफुलांचा हा बहर म्हणजे जणू रानाची रंगपंचमी होय. होळी उत्सवाच्या या काळात रानात झाडांना बहरलेला फुलोरा



आलेला दिसतो. यामध्ये काटेसावर, पळस, चाफा, बोगनवेल, बहावा, पांगिरा, ताम्हण, धामण, अर्जुन तसेच घराच्या परसदारी, बागेतून मोगरा, जाई–जुई, निशिगंध, जास्वंद अशी अनेक फुलझाडे बहरलेली दिसतात ती वेगळीच अशा या झाडांची बहरलेली शोभा रानावनात तर दिसतेच सोबतीला घराच्या अंगणात परसदारी भागातून अनेक झाडे फुललेली दिसतात. यावर्षी रविवार दि. १२ मार्च रोजी रंगपंचमी सर्वत्र उत्साहात साजरी झाली. या आनंदात निसर्गात बहरलेली रानफुले अधिकच उठावदार दिसत आहेत.

### ■ स्वरांचा आनंद ‘याची देहि याची डोळा’ घ्यावा

*या बरोबरीने आंबा, काजू, जांभूळ इत्यादी फळ झाडांचा मोहोरही सुरू झाला आहे. त्यामुळे रानात रंगांच्या उधळणी बरोबर गंधांची उधळणही मोठ्या प्रमाणात होत आहे. या सर्व फुलांनी वसंत ऋतूचे वैभव बहरून येते. माळरानांवर याबरोबरीने अनेक छोट्या मोठ्या वनस्पती फुलून येतात. होळीच्या रंगपंचमीचा हा ऋतू रानात फुलांचा पंचमस्वर आळवित आहे आणि या स्वरांचा आनंद ‘याची देहि याची डोळा’ घ्यावयास हवा. माणसांच्या रंगपंचमी बरोबर या दिवसात निसर्गाचीही रंगपंचमी साजरी होताना दिसत आहे.*

रंगपंचमीच्या या पर्वात रानात बहरलेली



ही फुले विविध नैसर्गिक रंगांसाठी उपयुक्त असून या रानफुलांचा उपयोग पर्यावरण पूरक रंग तयार करण्यासाठी होतो. ग्रामीण शहरी भागात रंगपंचमीसाठी पानाफुलांचा अनेक जण आवर्जून वापर करतात.

**काटेसावर** – वसंत ऋतूच्या स्वागतासाठी सज्ज झालेले हे झाड वसंत येण्यापूर्वीच सगळी पाने गाळून मोकळे होते आणि पूर्ण निष्पर्ण होवून गुलाबी रंगाची फुले बहरून येतात. भारतीय वंशाची हि वनस्पती कमीत कमी पाण्यावर कोठेही उगवते. मोठे फुल पाच पाकळ्या असलेल्या या फुलातील मध गोळा करण्यासाठी खारूताई आणि पक्षी या झाडावर दिसूत येतात. आयुर्वेदात औषधी असलेलीही वनस्पती गावाकडच्या लोकांसाठी पानातील कात म्हणूनही उपयोगी येते. पुराण कथेत भक्त प्रल्हादाचे रूप असलेली हि वनस्पती होळीत मध्यभागी लावून पूजा करतात. याच सावरीचा उपयोग कोकणात गोकुळाष्टमीची दहीहंडी बांधण्यासाठी केला जातो.

**पळस:**– वसंत ऋतूतील रानाचे वैभव म्हणजे पळस. तळहाताएवढी रुंद व जाड पाने असणारा हा वृक्ष डिसेंबर महिन्यानंतर फुलोऱ्यास येतो. पळसाला पाने तिनच ही म्हण रूढ करणारा हा वृक्ष. पानगळीनंतर इतका बहरून येतो की लाल रंगाची मुक्तपणे उधळण करतो. होळी उत्सवात बनविल्या जाणाऱ्या नैसर्गिक रंगात मुख्य रंग देणारा हा वृक्ष रंग उद्योगात फार प्राचीन काळापासून महत्वाचा असा वृक्ष आहे. लग्न कार्यादी प्रसंगात वापरल्या जाणाऱ्या भोजनाच्या पत्रावळी याच झाडाच्या पानांपासून तयार करतात. आयुर्वेदात औषधी म्हणूनही ही वनस्पती महत्वाची आहे.

**गुलमोहर:**– वसंतात गुलमोहराचे फुलणे काही औरच असते. घनदाट सावली देणारा हा वृक्ष ग्रीष्माचा दाह कमी करतो. लाल केसरी फुलांचा गुच्छ मिरवणारी याची फुले मनाला भूरळ घालतात.

**पांगारा:**– जानेवारी ते मार्च महिन्यात बहरणारा हा वृक्ष मऊ आणि लालभडक फुलांनी लक्ष वेधून घेतो. अनेक पक्षांना याची फुले आवडतात. पुराणात श्रीकृष्णाने देवेंद्राच्या बागेतूनही फुले चोरल्याची कथा प्रसिद्ध आहे.

**चाफा:**– वसंताच्या आगमनाच्या स्वागताला गावकुसाबाहेर अन क्वचित रानात दिसणारा पांढरा चाफा हि वनस्पती कोकणातील साऱ्यांचे लक्ष वेधून घेते. नेहमीच अबोल असणारे हे झाड वसंताची चाहूल लागण्यापूर्वीच नखशिखांत बहरून येते. देठांना पांढरेशुभ्र फुलांचे झुपके हे याचे वैशिष्ट्य. रायगडातील गावकुसाबाहेर मंदिराशेजारी हमखास हि झाडे लावेलेली दिसतात.

# निबंध स्पर्धेत मुख्याध्यापक महादेव जाधव यांचे यश



**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण आयोजित कै. प. स. मराठे आंतरशालेय निबंध स्पर्धेत माणगाव तालुक्यातील माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचे मुख्याध्यापक महादेव जाधव यांनी व्दितीय क्रमांक प्राप्त केला आहे. त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

संस्थेच्यावतीने प्रतिवर्षी कै. प स. मराठे स्मृतिदनानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. संस्थेच्या सर्व शाळांतील शिक्षक या स्पर्धेत सहभाग घेतात. विविध विषयांवर या स्पर्धेत सहभागी शिक्षक लेखन करतात. यावर्षी समान नागरी कायदा, अभिव्यक्ती स्वातंत्र्य शाप की वरदान,संस्कार इत्यादी विषयांवर लेखन स्पर्धा घेण्यात आली होती.

मुख्याध्यापक महादेव जाधव यांना प्राप्त झालेल्या द्वितीय क्रमांकाबद्दल संस्थेच्यावतीने कल्याण येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात त्यांना गौरविण्यात आले.

# डब्ल्यूटीसी फायनलमधून श्रीलंका बाहेर

## इंग्लंडमध्ये टीम इंडियाचा ऑस्ट्रेलियाशी होणार सामना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हजारो मैल दूर असलेल्या न्यूझीलंडच्या विजयाने भारताचे जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतील तिकीट निश्चित झाले आहे.



भारत आणि डब्ल्यूटीसी फायनलच्या तिकिटात श्रीलंका हा एकमेव अडथळा होता. श्रीलंकेने हा सामना जिंकला असता तर ते फायनलच्या शर्यतीत राहिले असते, मात्र शेवटच्या षटकापर्यंत झुंज देऊनही त्यांना क्राइस्टचर्च कसोटीत न्यूझीलंडला हरवता आले नाही. श्रीलंकेचा पराभव झाल्याने आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतून बाहेर गेला आहे.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपसाठी भारताचा सामना आता ऑस्ट्रेलियाशी होणार आहे, हा सामना लंडनच्या ओव्हल मैदानावर ७ ते ११ जून या कालावधीत होणार आहे. यजमान न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यात क्राइस्टचर्च येथे दोन सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना खेळला गेला. न्यूझीलंडचा कर्णधार केन विल्यमसनने नाणेफेक ते शेवटच्या चेंडूपर्यंत आपल्या संघाचे नेतृत्व केले. न्यूझीलंडला विजयासाठी ७० षटकांत २८५ धावांचे कठीण लक्ष्य मिळाले असताना त्याने शानदार शतक झळकावले. कर्णधार केन विल्यमसनने चौथ्या डावात १२१ धावांची नाबाद खेळी केली.

९ ते १३ मार्चदरम्यान जगाच्या दोन टोकांना दोन कसोटी सामने खेळले गेले. ऑस्ट्रेलियाचा संघ भारतासमोर होता आणि श्रीलंकेचा संघ न्यूझीलंडसमोर होता. फायनलच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी श्रीलंकेला हा सामना जिंकणे आवश्यक होते, पण श्रीलंकेचा संघ न्यूझीलंडकडून हरला. यासह डब्ल्यूटीसी अंतिम फेरीच्या शर्यतीत श्रीलंका बाहेर गेला.

श्रीलंकेकडून विजय मिळवण्यासाठी न्यूझीलंडला शेवटच्या १० षटकांत ५८ धावा करायच्या होत्या आणि त्यांच्या पाच विकेट शिल्लक होत्या, पण दोन षटके बाकी असताना त्यांची धावसंख्या सहा गडी बाद २७० अशी होती. खेळात एक षटक बाकी असताना न्यूझीलंड विजयापासून सात धावा दूर होता आणि तीन विकेट्स शिल्लक होत्या.

या भिन्न समिकरणांमध्ये एक गोष्ट समान होती आणि ती म्हणजे क्रीजवर उभा असलेला न्यूझीलंडचा कर्णधार केन विल्यमसन. शेवटच्या चेंडूवर एक धाव घेत न्यूझीलंडने सामना दोन विकेटने जिंकला.



# खो-खो स्पर्धेत रा. फ. नाईक अजिंक्य

## शीतल भोर ठरली अष्टपैलू खेळाडू

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक महिला दिनानिमित्त भारतीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालय, भारतीय खेल प्राधिकरण आणि खेलो इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने व महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने व दि अम्यॅच्यूअर खो-खो असोसिएशन ठाणे आयोजित खेलो इंडिया खो-खो दस का दम वुमन्स लीग २०२३ नुकतीच झाली.

या स्पर्धेत मुंबई, ठाण्यातील १० संघांना प्रवेश देण्यात आला होता. या स्पर्धेत नवी मुंबईच्या रा. फ. नाईक व बदलापूरच्या शिवभक्त क्रीडा मंडळाने उत्कृष्ठ कामगिरीच्या जोरावर अंतिम फेरीत धडक मारली. अंतिम सामन्यात रा. फ. नाईक महिला संघाने बदलापूरच्या शिवभक्त क्रीडा मंडळावर १०-९ असा एक डाव एक गुणाने दणदणीत विजय मिळवत बाजी मारली. रा. फ. नाईकच्या रूपाली बडेने विजयाची पायाभरणी केली, प्रणाली मागरने संरक्षण, शीतल भोरने दोन्ही डावात नाबाद राहत संरक्षण करीत दोन खेळाडू बाद करीत अष्टपैलू खेळ केला. साक्षी तोरणेने तीन खेळाडू बाद केले तर पुजा फरगडे व श्रद्धा शिंदे यांनी प्रत्येकी २-२ खेळाडू बाद केले. पराभूत शिवभक्तच्या रेशमा राठोडने तीन खेळाडू बाद केले तर मनोरमा शर्मा व कांचन पवारने प्रत्येकी २-२ खेळाडू बाद करण्यात यश मिळवले, मात्र शिवभक्तच्या इतर खेळाडूंनी निराशजनक कामगिरी केल्याने त्यांना मोठ्या परभवाला सामोरे जावे लागले. या स्पर्धेत रूपाली बडे सर्वोत्कृष्ट संरक्षक, रेश्मा राठोड सर्वोत्कृष्ट आक्रमक व शीतल भोर सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू ठरले.

### आरसीएफ प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धा

# अमोनिया ॲवेंजर्सने विजेतेपद पटकावले

**अलिबाग : प्रतिनिधी**

आरसीएफ थळ कारखान्यातील क्रिकेटप्रेमी युवा कर्मचाऱ्यांच्या पुढाकाराने आणि व्यक्तिगत योगदानातून या वर्षी प्रथमच आरसीएफ प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. साखळी सामन्यात अत्यंत चुरशीची लढत देत अंतिम फेरीत पोहचलेल्या अमोनिया ॲवेंजर्स संघाने साई ग्रुप संघाचा १० विकेट्सनी धुव्वा उडवून विजेतेपदावर आपले नाव कोरले.




या स्पर्धेत अमोनिया ॲवेंजर्स, एसजीपी स्टिमर्स, युरिया फाल्कन, डब्ल्यूपीएस लायन किंग्ज, आय इलेव्हन आणि साई ग्रुप असे सहा संघ सहभागी झाले होते. या संघांची मालकी अनुक्रमे तेजस गायकर, कल्पेश शेळके, सुनील घरत, संजय वानखेडे, मनोज घरत आणि सतीश पाटील यांच्याकडे होती. आरसीएफचे कार्यकारी संचालक (थळ) अनिरुद्ध खाडिलकर यांच्या हस्ते शनिवारी (दि. ११) या स्पर्धेचे उद्घाटन झाल्यानंतर लीग पद्धतीच्या सामन्यांना सुरुवात झाली. अंतिम फेरीत अमोनिया ॲवेंजर्सने साई ग्रुप संघाचा १० विकेट्सनी धुव्वा उडविला. प्रदीप घरतने अंतिम सामन्यात मॅन ऑफ द मॅच आणि मॅन ऑफ द सीरिज असे दुहेरी पुरस्कार पटकावले. स्पर्धेचे उत्कृष्ट फलंदाज केदार बिर्जे, उत्कृष्ट गोलंदाज धीरज पाटील तर उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अक्षय गोळे यांना घोषित केले गेले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात संतोष राणे, रघुवीर कदम,स्वप्नील वार्डे, अनिकेत पाटील, प्रतिक घाडी, अजिनाथ नागरगुजे, सर्वेश जोशी, अतुल ठाकूर, वैभव दबके, अक्षय गोळे, सुरज घासे, मयूर भोय या युवा खेळाडूंचा सहभाग होता.

# कन्याथॉन मॅरेथॉनमध्ये आबालवृद्ध धावले

**कर्जत : प्रतिनिधी**

विजयभूमी युनिव्हर्सिटी, रोटरी क्लब आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्या संयुक्त विद्यमाने कन्याथॉन मॅरेथॉन २०२३चे आयोजन केले होते. या मॅरेथॉनला कर्जत-खालापूरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. १० वर्षांच्या चिमुरडीसह ७० वर्षांचे ज्येष्ठ नागरिक असे १५०० जण या मॅरेथॉनमध्ये धावले. 'एक धाव मुलींसाठी, त्यांच्या शिक्षणासाठी त्यांच्या आरोग्यासाठी' ही या मॅरेथॉनची थीम होती.




१० किमी, पाच किमी, तीन किमी अशी स्पर्धा आयोजित करण्यात आली. व्यासपीठावर आमदार महेंद्र थोरवे, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे, विजयभूमी युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष संजय पडोडे, रोटरी क्लबचे अध्यक्ष सतीश श्रीखंडे, नगरसेवक संकेत भासे, माजी पंचायत समिती सदस्य मीना थोरवे, मनीषा भासे, विकास चित्ते आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

विजयभूमी युनिव्हर्सिटीच्या वतीने पोलीस वेल्फेअर फंडाला दोन लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. आमदार महेंद्र थोरवे यांनी, कन्याथॉन मॅरेथॉनमुळे महिलांचा सन्मान होत आहे. जिजाऊंसारखी माता होती म्हणून छत्रपती शिवाजी महाराज आपल्याला मिळाले. त्यांचा आदर्श ठेऊन आपण काम केले पाहिजे. अशा प्रकारच्या उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असा शब्द दिला. या वेळी १० वर्षांच्या प्रियांश भोईर, खालापूर पोलीस ठाण्याच्या अंमलदार ऋषी गायकवाड, पोलीस वाहनाच्या पहिल्या महिला चालक लतिका मधुकर आणि दिव्यांग जनार्दन यांचा विशेष सन्मान करण्यात आला. अमित काकडे यांनी स्पर्धेचे सूत्रसंचालन केले. १० किमी स्पर्धेत पुरुष गटात प्रथम लक्ष्मण धनावडे, द्वितीय देविदास कडाली यांना रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. महिला गटात प्रथम वेदिका मंडलिक तर द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या अंजली पंडित यांना गौरविण्यात आले. पाच किमी स्पर्धेत पुरुष गटात प्रथम प्रसन्नाथ राणा, द्वितीय विशाल कटाई, महिला गटात प्रथम क्रमांक धनश्री जोशी आणि द्वितीय क्रमांक कोमल पवार यांनी पटकावला त्यांना सन्मानचिन्ह देण्यात आले.

# अवनीश-अद्धिक इलेव्हन छत्रपती शिवाजी महाराज चषकाचा मानकरी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवानिमित्त साखर ग्रामस्थ मंडळ, जय भवानी क्रिकेट क्लबने तालुका ग्रामीण क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित केलेल्या भव्य ओव्हरआर्म टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धेच्या रविवारी (दि. १२)अखेरच्या दिवशी अवनिश विकासशेठ गोगावले संघाने दोन लाखांच्या बक्षिसासह छत्रपती शिवाजी महाराज चषक पटकावला. स्पर्धेमध्ये क्रिकेटपटूंनी १६ खुली संघ पारितोषिके आणि २४ असोसिएशन संघ पारितोषिके यांची अक्षरश: लयलूट केली.



१० मार्चपासून सुरू झालेल्या या भव्य ओव्हरआर्म टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धेच्या निमित्ताने पोलादपूर तालुका ग्रामीण क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष निलेश कोळसकर, युवा सेना कोअरकमिटी सदस्य विकास गोगावले, श्रीयश जगताप, चंद्रकांत कळंबे, अनिल दळवी, कृष्णा कदम, लक्ष्मण मोरे, विनायक दिक्षित, सिद्धेश शेठ, नरेश सलागरे, राकेश उतेकर आणि मेघना भोसले आदींनी भेट दिली.

उपविजेत्या क्रियांश इलेव्हन संघास एक लाख रुपये आणि चषक, मालिकावीर मयूर वाघमारे, उत्कृष्ट फलंदाज सलमान शेख, उत्कृष्ट गोलंदाज तानाजी तसेच असोसिएशनतर्फे ३० हजार रुपये प्रथम पारितोषिक आणि भव्य चषक, मुजम्मील तांबे वावे इलेव्हन संघास, द्वितीय पारितोषिक २० हजार रुपये प्रथम पारितोषिक आणि भव्य चषक भैरवनाथ देवळे संघास, तृतीय पारितोषिक १० हजार रूपये प्रथम पारितोषिक आणि भव्य चषक आदर्श क्रीडा मंडळ निवे संघाला प्रदान करण्यात आले. असोसिएशनतर्फे मालिकावीर आशिष कोळसकर देवळे, उत्कृष्ट फलंदाज अर्सनाल, उत्कृष्ट गोलंदाज मतिन अशी पारितोषिके प्रदान करण्यात आली. नारायण चोरगे यांच्या विशेष सहकार्याने गुरूवर्य हनुमंतबाबा मोरे वारकरी सांप्रदायाचे प्रमुख हरिश्चंद्र बाबा मोरे, आंतरराष्ट्रीय धनुर्धारी स्पर्धेतील रौप्यपदक विजेता अवनिश गोगावले, दर्पण पुरस्कार विजेते पत्रकार शैलेश पालकर, राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धा सुवर्णपदक विजेती खेळाडू श्रावणी कोळसकर, उद्यानपंडित पुरस्कार विजेते शेतकरी रामचंद्र रावजी कदमशेठ, पोलादपूर तालुका क्रिकेटचे वैभव संदीप कृष्णा कदम, मुख्याध्यापक तुकाराम मोरे, उपशाखा संघटिका कविता दशरथ चोरगे, प्रगतशील शेतकरी मनोहर जाधव, शरिरसौष्ठवपटू सुदर्शन लक्ष्मण खेडेकर, माजी सैनिक सुधीर शंकर चोरगे, आयुर्वेद तज्ज्ञ रामचंद्र मालुसरे आदींचा विशेष सत्कारदेखील करण्यात आला.




# तायक्वांडो स्पर्धेसाठी रायगडचा संघ जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड तायक्वांडो असोसिअशनचे अध्यक्ष सदानंद निंबरे, सचिव सुभाष गोकुळ पाटील, खजिनदार प्रभाकर भोईर यांनी भारतातील शिखर संस्था तायक्वांडो फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने होणाऱ्या राष्ट्रीय तायक्वांडो स्पर्धेसाठी रायगडचा संघ जाहीर केला आहे.

यात क्युरोगी प्रकारात मुले कौस्तुभ पाटील, सुरेश भोईर, किशोर पवार, विघ्नेश टोपले, उमंग लोधी, रीयांश ठाकूर, आदित्य घोडके, तनिष पाटील, अक्षज बालचप्पाद्दा, वेद मोरे, किरण कदम, सार्थक पाटील यांना संघ प्रशिक्षक तेजस माळी मार्गदर्शन करतील.

मुलींमध्ये ह्रीन्मयी भोपी, लावण्या जोडे, दिद्रीप्ता पटनायक, गौरी भोंडकर, वेदिका सरकामा, प्रांजळ पाबळे, अक्षरा घोडके, सिया मौर्या, स्वरा म्हात्रे, युक्ती घरत, श्रावणी भोसले, भक्ती भोपी यांना संघ प्रशिक्षक अक्षदा भगत मार्गदर्शन करणार आहेत.

पुमसे प्रकारात गौथम सुंदरम, वैभवी झा, लावण्या जोडे, कौस्तुभ पाटील, मितांषु पाटील, स्वराज पाटील, संघरक्षिता फाळके, आरोही खाणे या सहभागही होणार असून संघ प्रशिक्षक राकेश जाधव त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com